मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर ❯❯ मुंबई, बुधवार, २८ ऑगस्ट २०२४ ❯ वर्ष- २९ ❯ अंक - ६९ ❯❯ पाने- ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६

किंमत : ३ रुपये



Y गुणसूत्र लुप्त होणार! फक्त मुलींचाच होणार जन्म?

पान ८

## पुतळा उभारणीवरून अनेक प्रश्न कायम

### शिवप्रेमींमध्ये संताप



**प्रतिनिधी**
**मालवण/मुंबई**

पुतळा कोसळल्यानंतर याप्रकरणी शिवप्रेमी व विरोधकांकडून होणाऱ्या टिकेनंतर शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा 100 फूट उंचीचा पुतळा उभारण्यात यावा. तो सुद्धा महाराष्ट्र सरकारनं उभारावा, यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करणार असल्याचे सांगितलं.आजचा दिवस राज्यभरात दहीहंडी उत्सवाचा होता. परंतु राज्यभरातील शिवप्रेमींच्या भावना तीव्र आहेत. आज सोशल मीडियावर तर याबाबतच्या अनेक प्रश्नांना उधाण आले होते.

ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी बांधलेले भक्कम भुईकोट किल्ले, जलदुर्ग आजही दिमाखात उभे आहेत, त्याच स्वराज्याच्या छत्रपतींचा पुतळा अत्याधुनिक तंत्रज्ञान दिमतीला असूनही दहा महिनेही तग धरु शकत नाही, ही शोकांतिका या प्रकरणातली अक्षम्य हेळसांड आणि संभाव्य भ्रष्टाचाराची कल्पना देऊन जाते. या प्रकरणावर आता सरकार पांघरुण घालण्याचा प्रयत्न करत आहे का? एवढ्या घाईत पुतळा बनवण्याचं नेमकं कारण काय? 24 वर्षीय जयदीप आपटे यांना हा पुतळा बनवण्याचं काम कोणाच्या सांगण्यावरून देण्यात आलं होतं? कल्याणमधल्या व्यक्तीला हे काम का देण्यात आलं? हा पुतळा कोणाच्या अंगावर पडला असता तर? असे अनेक प्रश्न शिवप्रेमींकडून उपस्थित केले जात आहेत. परंतु यापैकी एकाही प्रश्नाचं उत्तर सरकार देत नसून केवळ यातून हात झटकण्याचा प्रयत्न सुरू आहेत, याबद्दल सर्वसामान्य शिवभक्तांमध्ये प्रचंड संतापाची भावना आहे.

गोविंदा रे गोपाळा...

## मुंबईसह राज्यभरात दहीहंडीचा उत्साह

**मुंबई :** मुंबईत दहीहंडी उत्सवाचा उत्साह दिसून येत असताना दुसरीकडे थरावरून कोसळल्याने काही गोविंदा जखमी झाल्याने सणाला गालबोट लागले आहे. मुंबईत 106 गोविंदा जखमी झाल्याची माहिती मुंबई महापालिकेने दिली. मागील काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने आज दमदार हजेरी लावल्याने गोविंदा पथकांचा उत्साह आणखीच शिगेला पोहचला. चाळीतील गल्लींपासून ते राजकीय पक्षांनी आयोजित केलेल्या लाखोंच्या कार्यक्रमात गोविंदांचा उत्साह ओसंडून वाहत होता. काही ठिकाणी आठ थर तर काही ठिकाणी 9 थर रचण्यात आले. संध्याकाळी 7.30 वाजेपर्यंत कोणत्याही गोविंदा पथकाला 10 थर लावता आले नाहीत. ठाण्यात 'जय जवान' गोविंदा पथकाने प्रयत्न केला मात्र, त्यांना अपयश आले..

### 'जय जवान'ने 'संकल्प'च्या दहीहंडीत लावले 9 थर



## शरद पवारांच्या गळाला बडे मोहरे



### पवार ॲक्शन मोडमध्ये

**प्रतिनिधी**
**मुंबई**

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार ॲक्शन मोडवर आल्याचं पाहायला मिळत आहे. राज्यातील बडे राजकीय मोहरे शरद पवारांच्या गळाला लागल्याचं चित्र आहे. शरद पवारांनी आपल्या या मिशनला कोल्हापूरमधून सुरूवात केलीय. कागलचे भाजप नेते समरजीत घाटगे पुढल्या काही दिवसांमध्ये शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत तर भाजपचे बडे नेते हर्षवर्धन पाटील यांनीही पुण्यात शरद पवार यांची भेट घेतली. दोघांमध्ये बंद दाराआड चर्चा झाली. त्यामुळे हर्षवर्धन पाटील हे विधानसभेला तुतारी हाती घेणार का अशी चर्चा सुरू झाली आहे.

दुसरीकडे अहमदनगरच्या कोपरगावातील राजकीय प्रस्थ विवेक कोल्हे यांनीही शरद पवारांची भेट घेतली. एवढंच नाही तर शरद पवारांनी स्वत: विवेक कोल्हेंना हाक मारुन गाडीत बसवून घेतलं. त्यामुळे कोल्हापूरनंतर शरद पवार पुढचा धक्का अहमदनगरमधून देणार का याची चर्चा सुरु झाली. विवेक यांच्या मातोश्री स्नेहलता कोल्हे या कोपरगावातून यापूर्वी आमदार राहिल्यात. मात्र 2019 मध्ये आशुतोष काळेंनी त्यांचा पराभव केला. आशुतोष काळे हे राष्ट्रवादीच्या फुटीनंतर अजित पवारांसोबत गेले. विवेक कोल्हे यांना भाजपकडून तिकीट मिळणं कठिण आहे. त्यामुळे त्यांनी शरद पवारांची भेट घेतल्याचं बोललं जातं आहे.

दरम्यान साताऱ्यातील मतन भोसले यांनीही राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेतली. भोसले हे वाई विधानसभा मतदारसंघातून इच्छुक आहेत. त्यामुळे मतन भोसलेही तुतारी हाती घेणार असल्याची चर्चा आहे. निवडणुका जशा जवळ येतील तसे पवारांकडून अजुनही काही अचंबित करणारे धक्के मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## मतदानापूर्वीच NDA ने राज्यसभेत गाठला बहुमताचा आकडा

### 12 सदस्यांची बिनविरोध निवड...

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

भाजपच्या नेतृत्वातील NDA सरकारने मंगळवारी राज्यसभेत पुन्हा बहुमताचा आकडा गाठला. राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी मतदानापूर्वीच भाजपचे 9 आणि मित्रपक्षांचे 2 सदस्य बिनविरोध निवडून आले. या विजयासह भाजपचे राज्यसभेतील संख्याबळ 96 झाले आहे, तर एनडीएच्या एकूण खासदारांची संख्या आता 112 वर पोहोचली आहे.

बिनविरोध निवडून आलेल्या इतर तीन सदस्यांमध्ये एनडीएचा मित्रपक्ष राष्ट्रवादी(अजित पवार गट) आणि राष्ट्रीय लोक मंचचा एक सदस्य आहे. याशिवाय सत्ताधारी एनडीएला सहा नामनिर्देशित आणि एका अपक्ष सदस्याचाही पाठिंबा आहे. दरम्यान, काँग्रेसचा एक सदस्यही बिनविरोध निवडून आला आहे. दरम्यान, राज्यसभेत बहुमत मिळाल्यामुळे भाजपला अनेक विधेयके मंजूर करुन घेणे सोपे होणार आहे.

9 राज्यांतील 12 जागांवर होणाऱ्या पोटनिवडणुकीपूर्वीच भाजपचे 10 उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यामध्ये आसाममधून मिशन रंजन दास आणि रामेश्वर तेली, बिहारमधून मनन कुमार मिश्रा, हरियाणामधून किरण चौधरी, मध्य प्रदेशमधून जॉर्ज कुरियन, महाराष्ट्रातून धैर्यशील पाटील, ओडिशामधून ममता मोहंता, राजस्थानमधून रवनीत सिंग बिट्टू आणि त्रिपुरातून राजीव भट्टाचार्जी यांचा समावेश आहे. याशिवाय, तेलंगणातून काँग्रेसचे अभिषेक मनू सिंघवी यांची बिनविरोध निवड झाली.

## 'सुरक्षित बहीण'ची जबाबदारीही शासनाचीच

**ठाणे**



आमचे सरकार गोविंदा पथकांच्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभे आहे आणि यापुढेही राहील. शासनाकडून गोविंदांसाठी जे जे शक्य आहे ते सर्व काही करण्यात येईल. "लाडक्या बहिणी" प्रमाणेच "सुरक्षित बहीण" ही जबाबदारी देखील शासनाचीच आहे, शासनाने ही जबाबदारी निश्चितपणे स्वीकारली आहे. हे शासन कोणत्याही गुन्हेगाराला सोडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली. प्रताप सरनाईक फाउंडेशन आणि संस्कृती युवा प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी उत्सवात ते बोलत होते. यावेळी खासदार नरेश मस्के, आमदार प्रताप सरनाईक, पूर्वेश सरनाईक, संस्कृती युवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी, विविध गोविंदा पथके व गोविंदाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बदलापुर पुन्हा हादरले, नात्याला काळीमा फासणारी घटना

## अल्पवयीन मुलीवर बापाकडून बलात्कार

**बदलापूर।** बदलापुरात शाळकरी मुलींवरील अत्याचाराची घटना ताजी असतानाच आता आणखी एक घटना उघडकीस आली आहे. बाप-लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना बदलापुरात घडली आहे. 16 वर्षांच्या मुलीवर बापानेच अनेकदा बलात्कार केल्याची घटना उघडकीस आल्यानंतर खळबळ माजली आहे. घटना उघड होताच आरोपी बाप फरार झाला आहे.

पीडितेने दिलेल्या माहितीनुसार तिचा बाप वारंवार तिला मारहाण करायचा आणि तिच्यावर बलात्कार करायचा. या त्रासाला कंटाळून मुलगी घर सोडून पळून गेली, पण नंतर घरी परतली. अखेर तिने पोलिसांशी संपर्क साधला आणि नराधम बापाविरोधात तक्रार दाखल केली.

## सचिन 'चितळे'चा ब्रँड अँम्बेसेडर

**पुणे ।** सचिन तेंडुलकर आता पुण्याच्या चितळेबंधूंचा ब्रँड अँम्बेसेडर देखील झाला आहे. आपल्या उद्योगाच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून सचिनला आपल्या ब्रँडशी जोडत असल्याची घोषणा चितळे बंधू मिठाईवालेचे भागीदार इंद्रनील चितळे यांनी केली. सचिन तेंडुलकर यांनीही आमची विनंती स्वीकारली आणि त्यामुळे ही घोषणा आज करत आहोत, असेही त्यांनी सांगितले.

मल्याळम सिनेविश्वात खळबळ

## मोहनलाल यांच्यासह सर्व सदस्यांचा राजीनामा

AMMA च्या सदस्यांवर लैंगिक शोषणाचे आरोप

**कोची**

दाक्षिणात्य सुपरस्टार अभिनेते मोहनलाल यांनी 'असोसिएशन ऑफ मल्याळम मुव्ही आर्टिस्ट' म्हणजेच AMMA च्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. हेमा समितीचा अहवाल समोर आल्यानंतर AMMA ची कार्यकारिणी समिती देखील बरखास्त करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून असोसिएशनच्या काही सदस्यांवर मल्याळम सिनेविश्वातील कलाकारांकडून लैंगिक शोषणाचे आरोप करण्यात आले होते. यापूर्वी याप्रकरणी अभिनेते सिद्दीकी यांनी रविवारी AMMA च्या सरचिटणीस पदाचा आणि दिग्दर्शक रंजित यांनी केरळ चलचित्र अकादमीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. आता मोहनलाल यांच्यासह अन्य सदस्य आपल्या पदावरून पायउतार झाले आहेत.

## जय शहा ICC च्या अध्यक्षपदी बिनविरोध

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**



भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (BCCI) सचिव जय शहा आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष झाले आहेत. मागील काही दिवसांपासून त्यांची या पदासाठी जोरदार चर्चा सुरू होती. आज नामांकन दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी इतर कोणी अर्ज न केल्याने जय शाह यांच्या अध्यक्षपदाचा मार्ग मोकळा झाला. विशेष बाब म्हणजे 16 पैकी 15 सदस्यांचा शहा यांना पाठिंबा होता. पण, शहा यांची बिनविरोध निवड झाल्याने आयसीसीला सर्वात तरुण अध्यक्ष मिळाला आहे. खरे तर जय शाह 2019 मध्ये पहिल्यांदा बीसीसीआयचे सचिव बनले. त्यानंतर 2022 मध्ये दुसऱ्यांदा त्यांच्याकडे ही जबाबदारी आली. 2025 मध्ये त्यांच्या या पदाचा कार्यकाळ संपुष्टात येणार होता. आयसीसीचे विद्यमान अध्यक्ष ग्रेग बार्कले यांचा कार्यकाळ 30 नोव्हेंबरला संपत आहे. भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी म्हटले होते की, जय शाह यांनी या पदाची जबाबदारी स्वीकारल्यास जगभरातील क्रिकेटसाठी फायद्याचे ठरेल.

जय शाह हे 1 डिसेंबरपासून आयसीसीच्या अध्यक्षपदाचा कारभार सांभाळतील.35 वर्षीय शाह हे आयसीसीच्या इतिहासातील सर्वात तरुण अध्यक्ष झाले आहेत. विशेष बाब म्हणजे ते आयसीसीचे अध्यक्ष झाल्याने बीसीसीआयच्या सचिवपदी कोणाची वर्णी लागते याची सर्वांनाच उत्सुकता आहे.

आयसीसीचे मावळते अध्यक्ष ग्रेग बार्कले यांनी 20 ऑगस्ट रोजी पुन्हा आयसीसीचे अध्यक्षपद स्वीकारण्यास नकार कळवला होता. नोव्हेंबरच्या अखेरीस त्यांचा कार्यकाळ संपणार आहे. शाह हे एकमेव उमेदवार असल्याने आणि त्यांची जागतिक क्रिकेटवर असलेली पकड पाहता त्यांच्या अध्यक्षपदावर शिक्कामोर्तब झाले.



वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, बुधवार, २८ ऑगस्ट २०२४

## अहिंसामय लढा म्हणजे काय हे डोमिनिकाने दाखवून दिले !

**वसई:** जे सामाजिक कार्यकर्ते असतात ते झपाटलेले असतात, ते बहिरे असतात, त्यांना लढ्यापासून कोणीही परावृत्त करू शकत नाही, वसईतील अनेक सामाजिक आंदोलनात, अन्यायाच्या विरोधात लढताना, डॉमिनिका डाबरेने आजपर्यंत जे काही मोलाचे कार्य केले, त्यात तिने हेच दाखवून दिले, अहिंसामय लढा म्हणजे काय याचे ती एक जिवंत उदाहरण आहे, असे गौरवास्पद उद्गार फादर डॉ. जोएल डिकुना यांनी काढले.सुमारे चार दशकांहून अधिक काळ समाजकार्यात झोकून कार्य करणाऱ्या डॉमिनिका डाबरे यांच्या 'जीवन चरित्रा'चा संक्षिप्त लेखाजोगा मांडणाऱ्या 'रणरागिणी डॉमिनिका डाबरे' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून फादर जोएल बोलत होते. गिरीज चर्चच्या आवारातील संत फ्रान्सिस झेविअर सभागृहात २५ ऑगस्ट रोजी संध्याकाळी हा समारंभ पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार युवराज मोहिते, महात्मा गांधी विचाराचे अभ्यासक मॅक्सवेल लोपीस, मॉन्सिनीअर फ्रान्सिस कोरिया प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते. या पुस्तकाचे संपादन नंदाखाल येथील वेरोनिका लोपीस आणि मर्सेस येथील साधना डिसिल्वा यांनी केले आहे.



थोडक्यात

### राज्यात बालमृत्यूच्या प्रमाणात लक्षणीय घट



**मुंबई:** राज्यातील बालमृत्यू कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून या प्रयत्नांना यश आल्याचे गेल्या काही वर्षाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. राज्यात दरवर्षी साधारणपणे २० लाख बालकांचा जन्म होतो. यापैकी आठ लाख बालकांचा जन्म हा आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये होतो तर चार लाख बालकांचा जन्म हा महापालिका वा नगरपालिकांच्या रुग्णालयांमध्ये होतो. सुमारे आठ लाख बालकांचा जन्म हा खाजगी रुग्णालयांमध्ये होतो असे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले. २०२२-२३ मध्ये राज्यात १७,१५० बालमृत्यूंची नोंद करण्यात आली तर २०२३-२४ मध्ये हेच प्रमाण कमी होऊन १३,८०९ बालकांच्या मृत्यूची नोंद आहे. बालमृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी गेली काही वर्षे आरोग्य विभागाच्या माध्यमातून पद्धतशीर उपाययोजना करण्यात येत असून त्याचेच हे दृष्य परिणाम असल्याचे आरोग्य संचालक डॉ नितीन अंबाडेकर यांनी सांगितले.

### शिक्षकाकडून सात वर्षाच्या मुलीचा विनयभंग

**मुंबई:** बदलापूर येथील लैंगिक अत्याचाराची घटना ताजी असताना गोवंडी येथेही धार्मिक शिक्षण संस्थेत शिक्षकाने सात वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अरबी शिक्षण घेणारी पीडित मुलगी या प्रकारमुळे घाबरली होती. त्यामुळे ती दोन दिवस धार्मिक शाळेत गेली नाही. अखेर आईने तिला विचारणा केली असता तिने घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर मुलीच्या आईने शिवाजी नगर पोलिसांकडे तक्रार केली.पीडित मुलगी अरबी भाषेचे शिक्षण घेण्यासाठी गोवंडी येथील धार्मिक शिक्षण संस्थेत जात होती. पीडित मुलगी नेहमीप्रमाणे २२ ऑगस्ट रोजी धार्मिक शिक्षण संस्थेत गेली असता तेथील शिक्षकाने तिचा विनयभंग केला. त्यामुळे धार्मिक शिक्षण संस्थेत जाण्यास ती घाबरत होती. दोन दिवसांपासून मुलगी अरबी शिकण्यासाठी जात नसल्यामुळे आईला संशय आला. तिने विश्वासात घेऊन विचारणा केली असता शिक्षकाने केलेला प्रकार तिने आईला सांगितला. अखेर पीडित मुलीच्या ३१ वर्षीय आईने याप्रकारणी शिवाजी नगर पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी सोमवारी विनयभंग व बालकांचे लैंगिक अपराधपासून संरक्षण कायद्याअंतर्गत (पोकसो) गुन्हा दाखल केला

# तुंगारेश्वर अभयारण्यातील उत्खननात निसर्गाचा बळी!



## मोठ्या प्रमाणात होणारी मानवी घुसखोरी वनसंपदेच्या मुळावर

**प्रतिनिधी**
**वसई**

तुंगारेश्वर अभयारण्यात सध्या मोठ्या प्रमाणात माती उत्खनन सुरू आहे. हे उत्खनन कोण व कोणासाठी करतोय या प्रश्नाची उत्तरे अधांतरी असून शासनाचे त्याकडे होणारे दुर्लक्ष निसर्गाचा व वनसंपदेचा बळी देण्यास कारणीभूत ठरू लागले आहे. सध्या तुंगारेश्वर अभयारण्यात मोठ्या प्रमाणात होत असलेली मानवी घुसखोरी हा चिंतेचा विषय असून वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे त्याकडे होणारे सर्रास दुर्लक्ष हा छुप्या अर्थकारणाचा विषय ठरला आहे.

तुंगारेश्वर अभयारण्य हे राष्ट्रीय अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. मात्र सध्या या अभयारण्यात काही इसमांकडून मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू आहे. हे उत्खनन कोणासाठी सुरू आहे? या उत्खननासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी आर्थिक सेटलमेंट झाली आहे का? असा संतप्त सूर वनप्रेमी नागरिकांकडुन व्यक्त होत आहे. दरम्यान, अनधिकृत बांधकामांसाठी सुरू असलेला मोठ्या प्रमाणावरील माती उत्खननासारखा प्रकार वनसंपदा व वन्यजीवांच्या मुळावर उठला आहे. तुंगारेश्वर अभयारण्यात अनधिकृत बांधकामांतून वाढती मानवी घुसखोरी होत असून येथे भूस्खलनासारखा धोका आ वासून उभा आहे.

स्थानिक वन विभागाचे अधिकारी या प्रकाराकडे कारवाईच्या बाबतीत करत असलेला काणाडोळा भूमाफिया व अनधिकृत बांधकामधारकांत आर्थिक व्यवहाराचे गुफ्तगू शिजल्याच्या प्रकारावर संशय व्यक्त करणारा आहे. त्यात वाढती विकासकामे तुंगारेश्वर अभयारण्यातील निसर्गाचा बळी देण्यास कारणीभूत ठरली आहे. दरम्यान, इको सेन्सिटीव्ह झोन, राखीव वने यासारख्या भूखंडांवर वाढत्या अनधिकृत बांधकामांचे लोण हा चिंतेचा विषय ठरला आहे. त्यादृष्टीने स्थानिक प्रशासनाने निसर्गाचा संहार

# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा उधवा मुख्य रस्त्यावर रास्ता रोको

## ओव्हरलोड येणाऱ्या ट्रकवर बंदी व प्रलंबित वनपट्ट्यांचा प्रश्न



**प्रतिनिधी**
**पालघर**

रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात प्रलंबित वनपट्ट्यांचा प्रश्न मार्गी लावत उतारे तात्काळ नावे करून देण्याची मागणी आंदोलकांनी केली. तसेच तलासरी-खानवेल मार्गावरून ओव्हरलोड येणाऱ्या ट्रकांवर बंदी घालावी आणि उधवा पोलिस तपासणी नाक्यावर ट्रकचालकांकडून होणारी वसुली थांबवण्याची मागणी व्यक्त करण्यात आली.

ग्रामीण भागातील नागरिक वनपट्टे, कोंडीची समस्या दूर करण्यासाठी कासा : मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. अनेक वर्षांपासून मागणी करत आहे. मात्र सरकार, प्रशासनाकडून याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही. या प्रकरणी निषेध करण्यासाठी दोन तासांपेक्षा अधिक काळ रास्ता चक्का जाम ठेवण्यात आला. या आंदोलनात आमदार विनोद निकोले, जि प सदस्य अक्षय दवणेकर ,चंद्रकांत घोरखाना, बच्चू वाघात, रडका कलंगडा, रामदास सुतार यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# चारकोपच्या माजी नगरसेविका संध्या दोशी यांचा शिवसेनेत प्रवेश

**प्रतिनिधी**
**मुंबई**

शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका संध्या दोशी यांनी रविवारी आमदार प्रकाश सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. त्यांच्या सोबत काही उपविभाग प्रमुख, शाखा प्रमुख, कार्यालय प्रमु, गट प्रमुख आणि विभागातील लोकांनी यावेळी प्रवेश केल्याचे संध्या दोशी यांनी सांगितले.

हा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शासकीय निवासस्थान असलेल्या मलबार हिल येथील नंदनवन बंगल्यावर रविवारी झाला. यावेळी आमदार प्रकाश सुर्वे, शिंदेंच्या शिवसेनेच्या प्रवक्त्या शितल म्हात्रे आदी उपस्थित होते. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत आतापर्यंत विविध पक्षांच्या विविध ८० हून अधिक माजी नगरसेवकांनी प्रवेश केला आहे.

# अग्निशमन जवानांच्या समस्या आता थेट महाराष्ट्र शासनाच्या दारात

## महाराष्ट्र अग्निशमन सेवा महासंघ सेवेस तत्पर

**प्रतिनिधी**
**मुंबई**

राज्य भरातील अग्निशमन विभागातील जवान आणि कार्यरत संघटनांच्या अडचणी शासन दरबारी डायरेक्ट मांडता येत नव्हत्या आता हया अडचनी शासन दरबारी मांडण्या करीता ठाणे महानगरपालीका, नाशीक महानगर पालिका, नवी मुंबई महानगरपलिका आणि इतर आस्थापणांनी मिळून महारष्ट्र अग्निशमन सेवा महासंघाची स्थापना करण्यात आली आहे. महासंघाचे प्रामुख्याने उद्दीष्टे असे आहे की सर्व आस्थापना मधील अग्निशमन जवानासाठी



शासनाचे सेवा शर्ती वेगवेगळ्या असून त्या एकच करण्यात याव्या जेणे करून एकसमानता येइल . टप्प्या-टप्प्याने कंत्राटी पध्दत बंद करून कंत्राटी, ठोक मनधन, रोजंदारी आणि इतर जवानांना सेवा शर्ती नुसार सेवेत कायम समावेशन करावे आणि राज्यातील सर्वच अग्निशमन जवानांना चागल्या दर्जाचा एकसारखा गणवेश व फायरसुट मिळावा. आजपर्यन्त अग्निशमन जवान आप आपल्या आस्थापनेशी न्याय मिळावा म्हणुन प्रयत्न करत होते पण आता थेट महाराष्ट्र आग्निशमन सेवा महासंघ उपलव्ध झाल्याने अनेक दशका पासुनच्या अडचणी सुटनार अशी अपेक्षा.राज्यातील सर्व अग्निशमन जवानांना आवाहन करण्यात येते की शासन दरवारी आज पर्यन्त आपला आवाज जात नव्हता तरी आपण या महासंघात मोठया प्रमाणात सामील व्हावे.

# विवेक करमोडा यांच्याकडून तलासरी व डहाणू तालुक्यात 24 गावात दहीहंडी उत्सव साजरा



**पालघर ।** जिल्ह्यात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. दहीहंडी हा फक्त एक उत्सव नसून साहसी खेळ आहे. हा उत्सव गावागावात व्हावा म्हणून तलासरी डहाणू तालुक्यातील २४ गावात गोविंदा पथके तयार केली. त्यांना आर्थिक मदत करून स्थानिक ठिकाणी गाव पातळीवर कार्यकारण घेण्यात आले. गावातील लोकांनी मोठ्या उत्साहाने उत्सव साजरा केला. खास करून तरुणांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. तसेच विवेक करमोडा हे मात्र तालुक्याच्या ठिकाणी उपस्थित होते.

### निलंबनाच्या कारवाईविरोधात ठाण्याचे शिक्षणाधिकारी उच्च न्यायालयात

मुंबई : बदलापूर येथील शाळेच्या आवारात दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर निलंबित करण्यात आलेले ठाण्याचे शिक्षणाधिकारी भाळासाहेब राक्षे यांनी मंगळवारी उच्च न्यायालयात धाव घेतली. तसेच, निलंबनाच्या निर्णयाला आव्हान दिले आहे. आपल्याला या प्रकरणी नाहक गोवण्यात आले असून आपल्यावरील निलंबनाची कारवाई ही राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचा दावा राक्षे यांनी केला आहे. राक्षे यांनी सुरूवातीला महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे (मॅट) निलंबनाच्या निर्णयाला आव्हान दिले होते. परंतु, न्यायाधिकरणाने कोणताही दिलासा न दिल्याने राक्षे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

# गोदी कामगारांच्या वेतनवाढीची बोलणी यशस्वी, संप टळला

## लढ्याला यश आल्याने कामगारांत आनंदाचे वातावरण

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मंगळवारी इंडियन पोर्ट असोसिएशन व पोर्ट अँड डॉक कामगारांचे सहा मान्यताप्राप्त महासंघ यांच्यात झालेली बोलणी यशस्वी झाल्यामुळे आजपासून होऊ घातलेला बंदर व गोदी कामगारांचा देशव्यापी बेमुदत संप टळला आहे. भारतातील प्रमुख बंदरातील कामगारांचा हा मोठा विजय झाल्याचे मानण्यात येते.

३१.१२.२०२१ च्या मूळ पगारात ३० टक्के महागाई भत्ता मिळवून त्यावर ८.५ टक्के फिटमेंट देण्याचे मान्य केले असून कामगारांना भरघोस पगार वाढ होणार आहे. वेतन कराराचा कालावधी



पाच वर्षांचा व घरभाडे भत्ता ३० टक्के यावर अगोदरच सहमती झालेली आहे. काल समझोता करारावर सह्या झाल्या असून लवकरच द्विपक्षीय वेतन समितीमध्ये अंतिम वेतन करार होईल. अशी माहिती सरचिटणीस सुधाकर अपराज यांनी दिली.

**या होत्या मागण्या**


* १ जानेवारी २०२२ पासून लागू होणारा वेतनकरार कोणत्याही अटीशिवाय त्वरित करा.
* इंडियन पोर्ट असोसिएशन व गोदी कामगारांच्या फेडरेशनस् यांच्यामध्ये झालेल्या बोनस ( पी. एल. आर. )कराराची त्वरित अंमलबजावणी करणे.
* सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन लाभांसह सर्व करार तात्काळ लागू करा.
* प्रमुख बंदरातील रुग्णालयांचे खाजगीकरण थांबवा. " सर्व विभागात विशेषता ऑपरेशनच्या ठिकाणी सुरुवातीच्या वेतनश्रेणीवर कामगारांची भरती करावी.
* जानेवारी २००७ पासून कर्मचाऱ्यांना १४ टक्के फिटमेंट व विशेष भत्ता देणे.
* बंदर मालमत्तेची विक्री थांबवा.
* पूर्वीप्रमाणे कामगार महासंघासोबत मंत्रालय स्तरावर नियमित बैठका सुरू करा.
* मंत्रालय व पोर्ट प्रशासनाने कामगार संघटनांचे अधिकार व विशेष अधिकारांचे रक्षण करून सर्व प्रकारच्या अनुचित कामगार पद्धती थांबवा.

अशा अनेक महत्त्वाच्या मागण्या फेडरेशनच्या नेत्यांनी केल्या आहेत.

# मुंबई उपनगर श्री गणेशोत्सव समन्वय समितीची गुरूवारी सभा

### *रंगशारदा सभागृहात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मार्गदर्शन करणार*

**प्रतिनिधी**
**मुंबई**



मराठी मनाचा मानबिंदू आणि महाराष्ट्राचे लाडके दैवत असलेला गणरायाचा गणेशोत्सव सोहळा येत्या 7 ते 17 सप्टेंबर दरम्यान उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या महाउत्सवासाठी मुंबई उपनगर गणेशोत्सव समन्व्यय समितीची स्थापना हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेने 2003 साली झाली होती. तेव्हापासून आजपर्यंत बाळासाहेब आणि शिवसेना पक्षप्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे या सोहळयासाठी एक शक्तीस्थान ठरले आहेत.

यंदाच्या उत्सवासाठीही माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभणार असून त्यासाठीच्या सभेचे आयोजन उद्या गुरुवार, 29 ऑगस्ट रोजी संध्याकाळी 6.30 वाजता, वांद्रे येथील रंगशारदा नाट्यमंदिरात करण्यात आले आहे. या सभेसाठी उपनगरातील सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन मुंबई उपनगर श्री गणेशोत्सव समन्व्यय समितीचे उपाध्यक्ष, आमदार अँड. अनिल परब( शिवसेना नेते) आणि सचिव विनोद घोसाळकर (उपनेते) यांनी केले आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 69**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ६९**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

मुंबई : कळमनुरी विधानसभेचे आमदार संतोष बांगर व त्यांचे (स्वीय सहाय्यक) भीमराव सावतकर यांनी काल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याची भेट घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री भीमाबाई आंबेडकर यांच्या सातारा येथील समाधी स्मुर्ती स्थळाच्या स्मारकाच्या कामातील तांत्रिक अडीअडचणी दूर करून स्मारकाच्या कामाच्या ठिकाणी भेट देऊन व संबंधित अधिकाऱ्याची व भीमाबाई प्रतिष्ठान सातारा यांची बैठक घेऊन स्मारकाच्या कामातील तांत्रिक अडचणी दूर करून 25 कोटींचा निधी उपलब्ध करून देण्या बाबत मागणी केली. असता मुख्यमंत्री यांनी तातडीने बैठक घेण्यासाठी अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत.



शासनाचे 'कंत्राटदार हिताय' धोरण...

# बेरोजगार सेवा संस्थांना काम देण्याच्या धोरणाला लावल्या वाटाण्याच्या अक्षता

## विरोधानंतर निर्णय मागे पण काही ठिकाणी अद्याप कंत्राटदारांकरवीच भरती

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

बेरोजगारीच्या ज्वलंत प्रश्नावर मार्ग काढावा यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यात बेरोजगार सेवा संस्था स्थापन करण्याचा व बेरोजगार संस्थांना पाच लाख रुपयांपर्यंतचे काम विनानिविदा देण्याचे धोरण जाहीर केले होते. त्याबाबत ऑक्टोबर २००० मध्ये शासन निर्णय जाहीर करण्यात आलेला होता.






या निर्णयामुळे अनेक बेरोजगारांच्या हाताला बेरोजगारांच्या हाताला काम मिळत आहे. मात्र गतिमान सरकारने ०६ सप्टेबर २०२३ रोजी राजकीय लागेबांधे असलेल्या कंत्राटदारांची तुंबडी भरण्यासाठी बाह्ययत्रनेद्वारे सरकारी व निमसरकारी खात्याला मनुष्यबळ पुरवण्याचा शासन निर्णय पारित केला. या शासन निर्णयानुसार एकूण ०९ कंत्राटदारांना राज्यभर सर्व शासकीय ठिकाणी मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी नियुक्त करण्यात आले. सरकारच्या या निर्णयाला सर्वस्तरातून मोठा विरोध झाल्याने हा निर्णय मागे घेण्यात आला आहे.

बाह्ययत्रनेद्वारे मनुष्यबळ पुरवठा करणे बाबतचा दिनांक ०६-०९-२०२३ रोजीचा शासन निर्णय सरकारने दि. ३१-१०-२०२३ रोजी रद्द केला आहे. तरीही राज्याच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अनेक औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिक्षक, शिपाई, सफाई कामगार व तत्सम मनुष्यबळ अद्यापही राजकीय पाठबळ असलेल्या बाह्ययत्रनेद्वारे पुरवठा कण्यात येत असल्याचे समजते. काही संस्था व व्यक्तींनी सरकारने दि. ३१-१०-२०२३ रोजीच्या शासन निर्णयास वाटाण्याच्या अक्षता लावून बाह्ययत्रनेद्वारे मनुष्यबळ पुरवठा चालू ठेवल्याचे समजते, त्यांची चौकशी व्हावी.

तसेच मनुष्यबळ परवठा करण्याची कामे जिल्हा कौशल्य विकास व उद्योजगता मार्गदर्शन केंद्राकडे विहित पद्धतीने नोंद असलेल्या बेरोजगार सेवा सोसायट्या व सेवा पुरवठा संस्थांना दिल्यास बेरोजगारांना न्याय मिळेल. सरकारने मोजक्या कंत्राटदारांची भर करण्यापेक्षा बेरोजगारांच्या हाताला काम देण्याचे व त्यांना स्वयंपूर्ण करण्याचे धोरण राबवावे अशी मागणी होत आहे. याबाबत 'दैनिक वृत्तमानस'च्या प्रतिनिधीने संबंधित अधिका-याशी संपर्क साधण्याच्या प्रयत्न केला असता. संपर्क होवू शकला नाही

# नेपाळ बस दुर्घटनेतील जखमी प्रवासी मुंबईत

## फडणवीसांनी घेतली भेट; तिघांवर आज शस्त्रक्रिया



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

नेपाळमधील पोखरा-काठमांडू दरम्यान प्रवासी बस एका नदीपात्रात कोसळून अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वैद्यकीय मदत कक्ष तसेच राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांच्या मदतीने आज नेपाळ येथून विमानाने मुंबई येथे आणण्यात आले. यामध्ये भुसावळ तालुक्यातल्या वरणगाव येथील एकूण ७ जखमी प्रवाशांचा समावेश आहे. या सर्व प्रवाशांना विमानाने काठमांडू, नेपाळ येथून महाराष्ट्रात आणण्याची जबाबदारी उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक व भारतीय जनता पक्षाचे रावेर लोकसभा मतदार संघाचे अध्यक्ष अमोल जावळे यांच्यावर सोपवण्यात आली होती. हे सर्व प्रवाशी काल संध्याकाळी मुंबई विमानतळावर सुखरुप पोहोचले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दुपारी या जखमींची बॉम्बे हॉस्पिटल येथे जाऊन विचारपूस केली.

या दुर्दैवी बस अपघातातील ७ जखमींना बॉम्बे हॉस्पीटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. मुंबई भाजपाचे अध्यक्ष आशिष शेलार आणि प्रवीण दरेकर यावेळी सोबत उपस्थित होते. या ७ जखमींपैकी तिघांवर उद्या शस्त्रक्रिया करावी लागणार आहे. उद्या आणखी ४ जखमींना मुंबईत आणण्यात येणार असून, त्यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार करण्यात येणार आहेत. या सर्व जखमींना सर्वतोपरी मदत करण्यात येत असून, उप मुख्यमंत्री कार्यालया (विधि) अंतर्गत कार्यरत असलेल्या वैद्यकीय सहायता कक्षामार्फत यासाठी संपूर्ण समन्वय ठेवला जात आहे. २३ ऑगस्ट रोजी नेपाळ मधील मर्स्यांगदी नदीत महाराष्ट्रातील प्रवाशांची बस कोसळली होती. या घटनेत २७ जणांचा मृत्यू झाले असून १६ जखमी झाले होते. त्यापैकी बहुतांश प्रवासी जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातल्या वरणगाव, तळवेल परिसरातील आहेत.

यातील जखमींच्या उपचारासाठी देवेंद्र फडणवीस यांचा वैद्यकीय मदत कक्ष पुढे आला असून त्यांनी जखमींना विमानाद्वारे मोफत मुंबई (Mumbai) येथे आणले तसेच त्यांची मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये मोफत उपचाराची व्यवस्था केली आहे. मृत्यूमुखी पडलेल्या प्रवाशांचे मृतदेह यापूर्वीच महाराष्ट्रात आणण्यात आले असून त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले आहेत. जखमी प्रवाशांच्या प्रकृतीत वेगाने सुधारणा व्हावी, अशा सदिच्छा त्यांना भेटून उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केल्या. ब्रेक फेल झाल्याने बसचा अपघात अयोध्या दर्शन घेण्याबरोबर नेपाळमधील पशूपती नाथांच्या मंदिरात दर्शन घेण्यासाठी वरणगाव येथील जवळपास ८० जण दोन बसच्या माध्यमातून नेपाळकडे निघाले होते.

# दहिहंडी उत्सवामुळे 55 ठिकाणी बेस्टच्या बस वाहतूक मार्गात बदल

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबईत मंगळवारी मोठ्या जल्लोषात दहिहंडी उत्सव साजरा करण्यात आला. तरुणाईने तर मज्जाच मज्जा केली. मात्र हा दहिहंडी उत्सव निर्विघ्नपणे साजरा करण्यात स्थानिक पोलीस, वाहतूक पोलीस यांनी मोठी मदत केली. तर रस्त्यावर, चौकात दहिहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आल्याने बेस्ट उपक्रमाला दिवसभरात तब्बल ५५ ठिकाणी बेस्ट बस वाहतुकीत बदल करावे लागले. तर, काही ठिकाणी बेस्ट बसचा प्रवास मार्ग खंडित करावा लागला.

त्यामुळे बेस्टच्या प्रवाशांनाही काही प्रमाणात त्रास सहन करावा लागला. तर, बेस्टच्या उत्पन्नावर काहीसा परिणाम झाला. मात्र लाखो गोविंदांनी दहिहंडी उत्सवाचा आनंद मनमुराद लुटला. त्यास बेस्ट उपक्रमाचाही काहीसा मदतीचा हातभार लागला. बेस्ट उपक्रमाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, शहर व उपनगरात दादर, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडूप, शिवाजीनगर, चुनाभट्टी, चेंबूर, चर्नी रोड, मरीन लाइन्स, काळबादेवी, भाईंदर आदी ठिकाणी बेस्ट उपक्रमाच्या बस वाहतुकीत बेस्ट प्रशासनाने वाहतूक पोलीस व स्थानिक पोलीस यांच्या सूचनेनुसार ५५ बसमार्गाच्या ठिकाणी बदल करण्यात आले.

# 106 गोविंदा जखमी : आठ जखमी रुग्णालयात दाखल तर 74 जणांवर उपचार करून घरी पाठवण्यात आले

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

दहीहंडी फोडण्याचा पारंपरिक उत्सव जल्लोषात साजरा करताना उंचंच उंच ९ थरांच्या दहीहंड्या फोडताना संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ६३ गोविंदा जखमी झाले होते. या जखमी गोविंदाना मुंबई महानगरपालिकेच्या, सरकारी तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी नेण्यात आले. त्या पैकी ८ जखमींना दाखल करून घेण्यात आले तर ३२ गोविंदांवर बाह्यरुग्ण कक्षेत उपचार सुरू होते व ७४ गोविंदांना उपचार करून घरी पाठवण्यात आले.

दरम्यान, जे.जे. हॉस्पिटल नेण्यात आलेल्या एका गोविंदावर उपचार करून घरी पाठवण्यात आले. सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलेल्या तिघांपैकी एका जखमी गोविंदाला दाखल करण्यात आले एकाला उपचारानंतर घरी सोडण्यात आले व एकावर ओपीडीमध्ये उपचार सुरू होते. जी टी रुग्णालयात नेण्यात आलेल्या एका जखमी वर उपचार करून त्याला घरी पाठवण्यात आले. पोतदार रुग्णालयात आलेल्या ६ गोंविंदांवर उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले. केईएम रुग्णालयात ८ जखमी पैकी १ दाखल आहे आणि इतर ७ जखमींवर ओपीडी मध्ये उपचार सुरू होते. नायर हॉस्पिटलमध्ये ५ जखमींवर ओपीडी मध्ये उपचार सुरू होते. सायन हॉस्पिटलमध्ये ७ जखमींवरओपीडीमध्ये उपचार सुरू होते, राजावाडी रुग्णालयात ३ जखमींपैकी दोघांना दाखल करण्यात आले तर एकाला उपचारानंतर घरी सोडण्यात आले. वीर सावरकर रुग्णालयातून एका जखमी गोविंदावर उपचार करून त्याला घरी सोडण्यात आले.

मुलुंडच्या एमटी अग्रवाल हॉस्पीटलमध्ये एका जखमी गोविंदाला दाखल करून घेण्यात आले आहे. तर कुर्ला भाभा रुग्णालयात २ पैकी एकाला दाखल करण्यात आले तर शताब्दी गोवंडी रुग्णालयात ६ जखमींवर उपचार करून घरी सोडण्यात आले.वांद्रे भाभा रुग्णालयात ३ जखमींवर उपचार करून घरी पाठवण्यात आले. जोगेश्वरीच्या ट्रॉमा केअर हॉस्पिटल मध्ये ४ जखमींवर उपचार करून घरी पाठवण्यात आले. सांताक्रुझ येथील व्ही एन देसाई हॉस्पिटल मध्ये तिघा जखमींवर ओपीडीमध्ये उपचार सुरू होते. मालाडच्या एम डब्लु देसाई हॉस्पिटलमध्ये एकावर उपचार करून त्याला घरी पाठवले. तसेच वांद्रे भाभा मध्ये ७ जखमींपैकी एकाला दाखल करण्यात आले तर ६ जखमींवर उपचार करून त्यांना घरी पाठवण्यात आले. लीलावती रुग्णालयात एका जखमीला दाखल करण्यात आले आहे.

# पवारांनी किती देवळं बांधली? राहुल गाधींचा धर्मच कळत नाही...

## नारायण राणेंचा विरोधकांवर हल्लाबोल

■ **मुंबई**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला होता. विशेष म्हणजे 8 महिन्यांपूर्वीच उभारण्यात आलेला हा पुतळा वाऱ्याच्या वेगाने कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेनंतर राज्यातील विरोधकांनी पुतळ्याच्या उभारणीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. तर, राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रविंद्र चव्हाण यांनी घटना घडल्यानंतर तात्काळ घटनास्थळ गाठून संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेनंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. तर, विरोधकांनी सरकारला चांगलंच धारेवर धरलं आहे. कमिशन आणि टक्केवारीमुळे दर्जेदार काम झालं नसल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. विरोधकांकडून छत्रपतींच्या पुतळा प्रकरणाचं राजकारण केलं जात असल्याचं सत्ताधाऱ्यांनी म्हटलंय. आता, केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनी याबाबत बोलताना थेट शरद पवारांवरच हल्लाबोल केला.



सिंधुदुर्गात घडलेली पुतळा घटना दुर्दैवी आहे, उद्या मी दुपारी 12 वाजता घटनास्थळी जाणार आहे आणि दुपारी पत्रकार परिषद घेणार आहे. मात्र, काल एक आमदार बांधकाम विभागाचं ऑफीस फोडण्यासाठी गेला. तो ऑफिस फोडण्यासाठी गेला ते ऑफीस बंद झाल्यावर आणि मिरवतो की मी निष्ठावान आमदार आहे. हा निष्ठावान आमदार सकाळी मातोश्री आणि संध्याकाळी एकनाथ शिंदे यांच्याकडे असतो, असे नारायण राणेंनी म्हटले. तसेच, आमदार झाल्यापासून कळलं नाही का, की तिथं जाऊन पुतळा पहावा, असा टोलाही राणेंनी नाव न घेता आमदार वैभव नाईक यांना लगावला. यावेळी, शरद पवार यांच्यावरही टीका केली.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही याप्रकरणावरुन राज्य सरकारवर टीका केलीय. त्यावरुन, आता नारायण राणेंनी थेट शरद पवार यांच्यावरच हल्लाबोल केला. "पवार साहेबांनी किती देवळं बांधली सांगा, यांना चांगलं काहीचं दिसत नाही. मेलेल्या माणसाच्या टाळूवरच लोणी खाणारी माणसं आहेत. राहुल गांधींबाबत तर काय बोलावं, त्यांचा धर्म कोणता आहे हेच कळत नाही", अशा शब्दात राणेंनी विरोधकांना टोला लगावला. जे विरोधक आता पुतळ्याबाबत बोलत आहेत त्यांनी 8 महिन्यांत पुतळा कसा झाला आहे, हे बघितलं का ? त्याला एखादा हार घातला का?, असा सवालही राणेंनी उपस्थित केला आहे.

कालचा हवेचा स्पीड बघा, घर पडतात, बिल्डिंग पडतात. बंदशिवाय यांना काय येतं. या प्रकरणाची चौकशी केली जाईल. काँग्रेस सगळ्या क्षेत्रात बदनाम आहे, त्यांना बोलण्याचा अधिकार नाही. या सगळ्यांना मी उघडं करीन, असेही नारायण राणेंनी म्हटलं.

मालवणच्या राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा 35 फूटी पूर्णाकृती पुतळा कोसळल्याच्या घटनेनंतर अहमदनगरमध्ये मराठा समाजाच्यावतीने राज्य सरकारविरोधात निदर्शने करण्यात आली.

# 95 टक्के पाणी साठा जमा

## मुंबईकरांचे टेन्शन मिटले

■ **मुंबई**

मुंबई महानगराला पाणी पुरवठा करणाऱ्या सात तलावांमध्ये ९५ टक्के पाणी साठा जमा झाला आहे. आतापर्यंत मोडक सागर, तानसा, विहार आणि तुलसी हे तलाव भरून वाहू लागले आहेत. अप्पर वैतरणा आणि मध्य वैतरणा हे दोन तलाव सुद्धा भरण्याच्या तयारीत आहेत.अप्पर वैतरणा .५५ आणि मध्य वैतरणा .९५ मीटर ने भरायचे शिल्लक आहेत. तर भातसा १.८१ मीटर ने भरणे शिल्लक आहे. अद्याप पावसाचा कालावधी महिनाभर शिल्लक असल्याने मुंबईकरांची पाण्याची चिंता मिटली आहे.

काल सकाळी ६ वाजता संपलेल्या २४ तासानंतर सर्व सात तलावातला पाणी साठा १३ लाख ७३ हजार ०७० दशलक्ष लिटर इतका जमा झाला आहे.सोमवारी तलाव क्षेत्रात चांगला पाऊस झाला.अप्पर वैतरणा तलावात ८८मिमी इतका पाऊस पडल्याची नोंद झाली. तर मोडक सागर ९१ मिमी,तानसा ४६,मध्या वैतरणा ९७ मिमी, भातसा ४७ मिमी इतका पाऊस पडला. त्यामुळे तलावातील पाण्याची पातळी वाढली आहे.

**मध्य रेल्वे**
**शुद्धिपत्रक**
मुख्य कार्यशाळा व्यवस्थापक ह्यांचे कार्यालय, पीओएच सानपाडा, मुंबई ४००७०५. ई निविदा क्र. आरआर/पीआर/एसएनपीडी/१२५/२३-२३/१६ कामाचे नाव: रेल्वे स्थानकाचे हरित प्रमाणीकरण. ई निविदा सूचना क्र. आर आर/पीआर/एसएनपीडी/१२५/२२-२३/१६ करीता शुद्धीपत्रक क्र १ दि. २३.०८.२०२४ संकेतस्थळ www.ireps.gov.in वर अपलोड करण्यात आले आहे.
SUN 355 सहाय्यक कार्य अभियंता
असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
घनकचरा व्यवस्थापन विभाग
अल्प मुदतीची निविदा सूचना

श्री.गणेश विसर्जना दिवशी निर्माल्य जमा करण्यासाठी अतिरिक्त डंपर्स व मनुष्यबळ गणेशोत्सवाच्या काळात श्री गणेश मुर्ती स्विकृती केंद्रावर मुर्ती स्विकारणे, निर्माल्य उचलणे व फिरते श्री. विसर्जन सेवेसाठी तसेच नवरात्री विजयादशमीच्या भाडेतत्वावर उपलब्ध करून घेणेकामी अल्प मुदतीची निविदा मागविण्यात येत आहे. सदरच्या कामाचे निविदा प्रपत्र www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि.२८/८/२०२४ ते दि. ०३/०९/२०२४ रोजी दुपारी ४.०० वा. पर्यंत उपलब्ध असून प्राप्त निविदा दि. ०४/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. किंवा निविदा उघडण्याची पुर्व सूचना देऊन निविदाकार अथवा त्यांच्या प्रतिनिधींसमोर उघडण्यात येतील. प्राप्त झालेली कोणतीही निविदा पुर्णत: अथवा अशंता: स्विकारणे अथवा नाकारण्याचे हक्क ठाणे महानगरपालिकेकडे राहतील.
ठामपा/पिआरओ/घ.क.व्य/३७३/२०२४-२५ सही/-
दि:२६.०८.२०२४ उपआयुक्त
Pls visit our official web-site www.thanecity.gov.in
घनकचरा व्यवस्थापन विभाग
ठाणे महानगरपालिका,ठाणे



*मुंबई : शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) आयोजित दहीकाला उत्सवास शिवसेना नेते दिवाकर रावते यांनी उपस्थित राहून साईसिद्धी गोविंदा पथकांना सन्मानचिन्ह,रोख रक्कम,कंब्रिजचा शर्ट दिला,यावेळी शिवसेना अपंग सहाय्य सेनेचे अध्यक्ष सूर्यकांत लाडे,आयोजक उपविभागप्रमुख यशवंत विचले, सौ सायली यशवंत विचले,पत्रकार,समाजसेवक भिमराव धुळप,माजी शाखाप्रमुख सिद्धार्थ चव्हाण यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.या उत्सवातील उर्वरित रक्कम गोरगरीब रुणाच्या वैधकीय मदतीसाठी दिली जाणार आहे..*

**मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड**
निविदा करिता विनंती- एमआरवीसी/ जी.एस./१०१आर/जी.एस./लॉट-१/ ई.एल.वी./वी.आर-डी.आर.डी/ क्वार्टर्स आणि सर्व्हिस बिल्डिंग
(एक पाकिट ई- प्रोक्योरमेंट निविदा प्रक्रिया)
मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लि. ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई-४०००२० येथे आहे, यांचे द्वारे "पश्चिम रेल्वेच्या विरार-डहाणू विभागातील निवासी क्वार्टर, RRI / RPF / सर्व्हिस बिल्डिंगसाठी लिफ्टची खरेदी (डिझाइन, उत्पादन, पुरवठा, मल्टीपल लोडिंग/अनलोडिंग, इन्स्टॉलेशन, टेस्टिंग, चालू आणि वॉरंटी कालावधी दरम्यान देखभाल). " इ-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदाचे तपशील आणि निविदा दस्तावेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट https://www.eprocure.gov.in/eprocure/app. वर उपलब्ध आहेत। पूर्ण भरलेली ई-निविदा वेबसाईट https://www.eprocure.gov.in/eprocure/app. वर जमा करण्याची शेवटची तारीख **३०.०९.२०२४** रोजी **दु. १२:३० वा.** पर्यंत आहे. **शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वैबसाईट वर प्रसिद्ध करण्यात येईल.**

एमएमआरडीए MMRDA
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
७ वा मजला, मुं.म.प्र.वि.प्रा. नवीन प्रशासकीय इमारत, प्लॉट क्र.सी-१४ व १५, वांद्रे – कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी क्र.०२२-२६५९०००१/०४ फॅक्स : ०२२-२६५९४१८२ वेबसाईट : https://mmrda.maharashtra.gov.in
**ई- निविदा सूचना**
कामाचे नाव : MMRDA/Metro-PIU/2024/CA-259 : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत - मेट्रो मार्ग-९ (दहिसर (पू) ते मिरा भाईंदर) या मेट्रो प्रकल्पावरील दहिसर (पू), पांडुरंगवाडी, मिरागाव व काशीगाव या मेट्रो स्थानकांच्या सईनेजेस व ग्राफिक्सचे डिझाईन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी करणीयबाबत निविदा मागवित आहे.

| कामाची अंदाजित रक्कम (रु.) | कोऱ्या ई-निविदेची किंमत (रु.) | अनामत रक्कम (रु.) | ई-निविदा डाउनलोड करण्याचा कालावधी | |
|---|---|---|---|---|
| | | | तारीख / वेळ (पासुन) | तारीख / वेळ (पर्यत) |
| रु. ४,६२,५८,५११.०० | रु.२,०००/- + जीएसटी (नापरतावा) | रु. ५.४६ कोटी | २८/०८/२०२४ (सायं. ०६.००) | ०५/०९/२०२४ (सायं. ०६.००) |

• निविदा पूर्व-बैठक : २९/०८/२०२४ (सकाळी ११.०० वाजता)
• निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख : ०५/०९/२०२४ (सायंकाळी ६.०० पर्यंत)
• कामाचा कालावधी : ४ महिने (पावसाळ्यासहीत)
टिप : ई-निविदा प्रपत्रे, शुध्दीपत्रक व इतर माहिती https://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करता येईल. ई-निविदे संबंधीत सविस्तर माहिती आणि मदतीसाठी support-eproc@nic.in या ई-मेल किंवा दूरध्वनी क्र.०२२-२६५९ ४१५१/ ५९७३ वर संपर्क साधावा. तसेच **श्रीमती योजना पाटील, कार्यकारी अभियंता (स्थापत्य)**, यांच्याशी संबंधित जाहिरातीकरिता आवश्यकता असल्यास क्र. ०२२-२६५९४१०९ या दुरध्वनी व ई-मेल : yojana.patil@mailmmrda.maharashtra.gov.in वर संपर्क साधावा.
तारीख : २८/०८/२०२४ सही/-
ठिकाण : मुंबई कार्यकारी अभियंता
मेट्रो प्र.अं. शाखा, मुं.म.प्र.वि.प्रा.
Fulrani


**जाहीर नोटीस**
जे.पी.नगर विरार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या;पत्ता-मौजे कोफराड, पोष्ट-आगाशी, ता.वसई, जि. पालघर, विरार (प)- ४०१३०१ या संस्थेचे सभासद असलेले व संस्थेची इमारत क्र. ए-३ मधील सदनिका क्र.९३ धारण करणारे श्री गजानन दाजी परुळेकर यांचे दिनांक ०७.१२.२०२२ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. मयत सभासदाचे श्री अरविंद गजानन परुळेकर हे एकमेव वारसदार आहेत. कै. गजानन दाजी परुळेकर यांच्या पत्नी व श्री अरविंद गजानन परुळेकर यांच्या मातोश्री कै. सुनंदा गजानन परुळेकर यांनी सदरची सदनिका ही परांजपे कन्स्ट्र.कं.कडून दि.०५/०७/१९९४ रोजीच्या खरेदी खताद्वारे खरेदी केली होती. त्यांचे दि.२२/०२/२०१३ रोजी निधन झाले.त्यांनी लिहून ठेवलेल्या व दुय्यम निबंधक वसई २ येथे नोंदणी केलेल्या दि. ०३/१२/१९९८ रोजीच्या मृत्युपत्रात त्यांचे मृत्युपश्चात सदरची सदानिका क्र.९३ चे मालक त्यांचे पती श्री गजानन दाजी परुळेकर हेच होतील व त्यांचे मृत्युपश्चात सदर सदनिकेचा एकमेव मालक त्यांचा मुलगा श्री अरविंद गजानन परुळेकर हाच होईल असे नमूद केले आहे. सदरच्या मृतुपत्रानुसार श्री गजानन दाजी परुळेकर यांना जे.पी नगर विरार को ऑप.हौ. सो.लि तर्फे सभासदत्व देण्यात आले होते. आता त्यांचे वारसदार श्री अरविंद गजानन परुळेकर यांनी मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधीचा अर्ज संस्थेला सादर केला आहे. संस्थेकडून या नोटिशीद्वारे संस्थेच्या भागभांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार आणि दावेदार यांचेकडून हक्क मागण्या/हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या व हरकतींच्या पृष्टर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे संस्थेच्या सचिवांस सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क, मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरनाबाबत संस्थेच्या उपविधिनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहिल व भविष्यात कोणताही आक्षेप, दावा प्राप्त झाल्यास तो त्यागित केल्याचे मानण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
सही/-
दिनांक: २८.०८.२०२४ सचिव
ठिकाण: विरार जे.पी.नगर विरार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या;

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**
बांधकाम विभाग, प्र.स.क्रं १
**ई-निवीदा सुचना क्रमांक ५६ सन २०२४ / २५**
**मा.श्री.रईस कासम शेख, आमदार, भिवंडी पूर्व, विधानसभा सदस्य यांच्या मा आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम निधी २०२४- २५ अंतर्गत**
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत खालील नमुद कामाचे निविदा फॉर्म दिनांक २८/०८/२०२४ ते दि. ०४/०९/२०२४ पर्यंत विक्रीस उपलब्ध आहे.

| अनु. क्रं. | कामाचे नाव | अंदापत्रकिय रक्कम | निविदापत्राची किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १ | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग क्रं. १ वॉर्ड क्रं. १० येथील गुलजारनगर परिसरात गटार व पायवाट तयार करणे. | १३,९९,१३०/- | ५९०/- |
| २ | भिवंडी पूर्व विधानसभा मतदार संघातील भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग क्रं. १ वॉर्ड क्रं.०२ रफिकनगर, अवचितपाडा येथे गटार, जमजम हॉटेल ते शमीम घरापर्यंत गटार व शहाबुद्दीन बाबा घरापासुन इसरार मुकादम गटार व पायवाट बनविणे | ९,९९,५८७/- | ५९०/- |
| ३ | भिवंडी पुर्व विधानसभा मतदार संघातील भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग क्रं. १ वॉर्ड क्रं. ०४ आमपाडा येथे डॉं. शहंशाह यांचे घर ते बाबडीपर्यंत व बारा चाळी अमजद यांचा घराजवळ गटार व पाथवेज बनविणे. | ९,९९,८०४/- | ५९०/- |
| ४ | भिवंडी पूर्व मतदार संघातील भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग क्रं. १ वॉर्ड क्रं. १० मनपा शाळा क्रं. ७० जवळील परिसरात गटार व पेव्हरब्लॉक बसविणे. | ६,९९,३५१/- | ५९०/- |
| ५ | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग क्रं. १ वॉर्ड क्रं. १० परकार बिल्डींग, औलिया मस्जिद जवळ गटार व पाथवेज बांधणे. | ५.९९.५४९/- | ५९०/- |

वरील ऑनलाईन निविदा दि. ०४/०९/२०२४ पर्यंत दुपारी ४.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच सदरची निविदा ही दि.०५/०९/२०२४ रोजी संध्या. ४.०१ अथवा कार्यालयीन कामकाजाच्या सोईप्रमाणे निविदा समिती समक्ष उघडण्यात येईल. अधिक माहिती महानगरपालिकेच्या mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन प्राप्त होऊ शकेल अथवा नविन शासकीय इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.
सही/-
(सचिन नाईक)
प्र. शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
जा.क्र. /ज.सं.वि./११०३
दिनांक : २६/०८/२०२४

मी कधीही हरत नाही. एकतर मी जिंकतो किंवा शिकतो.



- नेल्सन मंडेला
माजी राष्ट्राध्यक्ष

वृत्तमानस
मुंबई, बुधवार, २८ ऑगस्ट २०२४

# काळजी फक्त शासनानेच घ्यायची का?

आपला देश सामाजिक विविधतेने भरलेला आहे. इथे अनेक जाती, धर्मांचे लोक राहतात, ज्यांच्या विविध चालीरीती आणि परंपरा आहेत. भारतीय समाज धार्मिक श्रद्धा आणि परंपरांना अधिक महत्त्व देतो, जे बालविवाहाच्या प्रचलित प्रथेचे सर्वात मोठे कारण ठरत आहे. बालविवाह रोखण्यासाठी कायदा असला तरी राज्यात ही कुप्रथा थांबलेली नाही. समाजातील अनेक घटकांमध्ये अजूनही मुलगी हे ओझे मानले जाते. विवाह केल्यानंतर जबाबदारीतून मोकळे होता येते, या समजातून मुलीच्या शिकण्याच्या वयात शिक्षण अर्धवट थांबवून तिला विवाहबंधनात अडकविले जाते. आजवर जनजागृती मोहिमा राबविण्यात आल्या. बालविवाहांवर सरकारने कठोर कारवाई सुरू केली. पण बालविवाह प्रतिबंध कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीअभावी अनेक भागांत मुलींच्या मनाविरुद्ध विवाह केले जातात. निर्धारित मर्यादेपेक्षा मुलीचे वय कमी असेल तर कायद्यात शिक्षेची तरतूद आहे. अनेक भागांत कारवाई होताना दिसते, पण तरीही हा प्रश्न कायम आहे. बालविवाह प्रतिबंध कायदा मुलींना संरक्षण देणारा आहे. या कायद्याप्रमाणे लग्नासाठी मुलीचे वय १८ वर्षे तर मुलाचे वय २१ वर्षे असणे गरजेचे आहे. वर किंवा वधू यांच्यातील एक जरी अल्पवयीन असेल तरी तो बालविवाह ठरतो. असा विवाह करणारी सज्ञान व्यक्ती, लग्न ठरवणारे, पार पाडणारे, हजर असलेले सर्व या कायद्यानुसार गुन्हेगार ठरतात. ज्या बालक वा बालिकेचा विवाह झाला आहे त्यांना तो मान्य नसल्यास न्यायालयात अर्ज करून रद्दबादल ठरवता येतो. राज्यात मागील वर्षात किमान ९३० बालविवाह रोखण्यात आले असून, यापैकी ७१ प्रकरणांमध्ये प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला आहे. काही अंशी ही समाधानाची बाब आहे. राज्यातील अनेक भागांत आईवडील किंवा नातेवाइकांच्या संमतीनेच दुर्दैवाने बालविवाह घडून येतात, असे दिसून आले आहे. या बालविवाहामुळे अनेक समस्या निर्माण होतात. लहान वयात लादलेल्या गरोदरपणामुळे व प्रसूतीमुळे कायमचे अपंगत्व येऊ शकते. तसेच गर्भपात, कमी वजनाचे अर्भक, अकाली प्रसूती, अर्भक मृत्यू व उपजत मृत्यूची शक्यता वाढते. माता मृत्यूचे प्रमाण वाढते. अपरिपक्व वयातल्या विवाहात वधू-वरांची निवड माय-बाप करतात. मुलामुलींच्या पसंती-नापसंतीचा विचार केला जात नाही. त्यामुळे रूप, बुद्धिमत्ता, पात्रता, वय इत्यादीतील विषमतेमुळे हे विवाह विजोड ठरतात. अज्ञान, दारिद्र्य, रूढीप्रियता आणि परंपरा या कारणांनी बालविवाह घडून येतात. ग्रामीण भागात विवाह असला की तलाठी, ग्रामसेवक, पोलिस पाटील व शिक्षकांना निमंत्रण दिले जाते. या लोकांनी होणार असलेल्या विवाहाबाबत अर्थात मुलामुलींच्या वयाबाबत माहिती घेऊन कमी वयात होणारे विवाह थांबवायला हवेत. कोविड संकटाच्या काळात बालविवाहांची संख्या वाढेल, ही शक्यता गृहित धरून महाराष्ट्र सरकारने कसोशीने प्रयत्न केले. त्याचाच परिणाम म्हणून राज्यभरात ७९० बालविवाह रोखण्यात आले. त्याचं कौतुक होतंय. पण याच काळात अनेक ठिकाणी बालविवाह झाल्याचं वास्तव डोळयात अंजन घालणारं आहे. अनेक बालविवाह रोखण्यात अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, बाल संरक्षण अधिकारी, जिल्ह्यातील बालकल्याण समित्यांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. आतापर्यंत बालविवाह झालेल्या मुली १५ ते १८ वयोगटातील दिसत होत्या. पण कोविडच्या काळाचा सामना करण्यासाठी गरीब कुटुंबांनी आर्थिक भार नको म्हणून बालविवाहाचा हा पॅटर्न बदलून टाकलेला दिसतो. आता ११-१२ वर्षांच्या मुलींचीही लग्नं लावली जातात हे वास्तव आहे. एकीकडे आपले राज्य पुरोगामी आणि प्रगत म्हणून ओळखले जात असले तरी याच पुरोगामी महाराष्ट्रात आजही अनेक ठिकाणी बालविवाह केले जातात. बालविवाहाबाबत कायदा असला तरी ग्रामीण भागात अथवा वाड्या-पाड्यांवर असे विवाह उरकले जातात. सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रारी केल्यानंतर काही ठिकाणी असे बालविवाह वेळीच रोखले गेले असले तरी त्याला अजूनही संपूर्ण यश आलेले नाही. कायदा असूनही असे बालविवाह अजूनही का केले जातात, याचा साधकबाधक विचार करण्याची वेळ आली आहे. बालविवाह होण्याची अनेक कारणे आहेत. राज्यातील तसेच देशातील गरीब कुटुंबे आपल्या मुलांना लग्नामध्ये कर्ज देण्याची किंवा काही पैसे कमविण्यासाठी किंवा दारिद्र्याचे चक्र सोडण्याकरिता बालविवाहाचा मार्ग पत्करतात. अशा बालविवाहासाठी काही पूर्वग्रह आणि काही श्रद्धा कारणीभूत ठरत आहेत. निरक्षरता शिक्षणाअभावी लोकांना बालविवाहाचे दुष्परिणाम माहीत नाहीत. तसेच स्त्री शिक्षणाचे महत्त्व न समजल्यामुळे बालविवाह होत आहेत. आजही देशातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात आहे, जी शेती आणि पशुपालनाद्वारे आपला उदरनिर्वाह करते. या दोन्ही कामांत अधिक मनुष्यबळाची गरज असल्याने लहान वयातच लग्ने केली जातात, जेणेकरून लवकर मुले जन्माला येतील आणि घरातील कामात मदत करण्यासाठी मानवी श्रम उपलब्ध होऊ शकेल. वैदिक सभ्यतेमध्ये स्त्रियांना कुटुंबात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले गेले. भारतात मुघलांचे आगमन होताच स्त्रियांची अवस्था बिकट होत गेली. या दुष्ट लोकांच्या नजरेतून त्यांना वाचवण्यासाठी महिला आणि मुलींसाठी पर्दा पद्धती आणि बालविवाह यांसारख्या प्रथा सुरू झाल्याचा दाखला अनेकदा दिला जातो. बालविवाहासारख्या वाईट प्रथेला गरिबी हेदेखील कारण आहे. गरिबीमुळे घरातील कमावत्या सदस्यांची संख्या वाढावी म्हणून लहान वयातच विवाह केले जातात. अनेक वेळा बालविवाहाची माहितीच सरकारी यंत्रणांपर्यंत पोहोचत नाही. बालविवाह झालेल्या अल्पवयीन मुली जेव्हा प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल होतात तेव्हा अनेक घटना उघडकीस येतात. बालविवाहाची ही कुप्रथा प्रथा बंद करण्यासाठी या कुप्रथेविरुद्ध समाजात जागृती आणली पाहिजे. या वाईट प्रथेच्या हानीबद्दल पालकांना सांगितले पाहिजे. या कामासाठी समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती आणि धर्माशी निगडीत लोक आणि स्वयंसेवी संस्थांची मदत घेणे आवश्यक आहे. चित्रपट थिएटर, माहितीपट आणि पथनाट्य इत्यादींद्वारे या वाईट प्रथेचे दुष्परिणाम प्रदर्शित करणेदेखील समाजात जागरूकता आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ही वाईट प्रथा थांबवण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे मुलींना शिक्षण देणे. मुली जेव्हा शिकू लागतील तेव्हा त्या स्वतः बालविवाहाला नाकारतील. त्यामुळे मुलांना मोफत शिक्षण दिले पाहिजे. मोबाइल एज्युकेशन प्रणाली दुर्गम भागात लागू करून मुलांना व्यावसायिक शिक्षण देण्याची व्यवस्था सरकारने करावी. तसेच ही प्रथा बंद करण्याचा दुसरा महत्त्वाचा मार्ग म्हणजे समाजात जागृती निर्माण करणे. बालविवाहाची कायदा व्यवस्था, प्रबळ राजकीय इच्छाशक्ती आणि लोकसहभागाची विशेष गरज आहे. आज आपला देश सर्वच क्षेत्रांत प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाइल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावरदेखील आपण यशस्वी स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशांत आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेडांपाड्यातील मुली बालविवाहाला बळी पडत आहेत, ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बालविवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बालविवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सर्वांनाच जागृत करणे गरजेच आहे. भारतात बालविवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था आणि समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बालविवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे ज करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी, असा नियम केला तर बालविवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बालविवाह होऊ नये यासाठी विविध स्तरांतून जनजागृती करावी. ज्याप्रमाणे अस्पृश्यता, सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, केशवपन या अनिष्ट चालींचे उच्चाटन झाले त्याप्रमाणे बालविवाहाचेदेखील उच्चाटन व्हायला हवे. यासाठी सर्वांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. कारण केवळ शासनानेच काळजी घेणे पुरेसे नाही.

# नंदनवनात रंगणार लोकशाहीचा उत्सव

जम्मू काश्मीरला विशेष अधिकार देणारे ३७० वे कलम हटवल्या नंतर जम्मू काश्मीर मध्ये पहिल्यांदाच निवडणुका होणार आहे. जम्मू काश्मीर मध्ये विधानसभेच्या निवडणुका सप्टेंबर मध्ये होणार असून तशी घोषणा निवडणूक आयोगाने नुकतीच केली. या निवडणुकीची तयारी निवडणूक आयोगाने काही वर्षापासूनच सुरु केली होती. त्यासाठी निवडणूक आयोगाने जम्मू काश्मीर मधील मतदार संघाची पुनर्रचना केली होती. मतदार संघाची पुनर्रचना करण्यासाठी माजी न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. समितीत तात्कालिन मुख्य निवडणूक आयुक्त सुशील चंद्र व उपायुक्त चंद्रभूषण कुमार हे सदस्य होते. या समितीने आपला अहवाल सादर केल्यानंतर २०२२ सालीच जम्मू काश्मीर विधानसभा आणि लोकसभेच्या नवीन मतदार संघाची अधिसूचना जाहीर झाली होती. या अधिसूचनेनुसार जम्मू काश्मीर राज्यात एकूण ९० विधानसभा मतदार संघ असून त्यातील ४३ मतदारसंघ जम्मू क्षेत्रात तर ४७ मतदारसंघ काश्मीर क्षेत्रात आहे. मतदार संघाची पुनर्रचना झाल्याने जम्मू काश्मीरमधील अनेक नेत्यांना नवीन मतदार संघ शोधण्याची वेळ आली आहे कारण काहींचा मतदार संघ गायब झाला आहे तर काहींचा मतदारसंघ आरक्षित झाला आहे. मतदार संघाची पुनर्रचना झाल्यावर विरोधकांनी त्यावर टीकाही केली होती कारण पुनर्रचनेनंतर जम्मू क्षेत्रातील मतदारसंघात वाढ झाली आहे. जम्मू क्षेत्रात हिंदू धर्मीय लोकांची संख्या जास्त आहे. हिंदूंची मते मिळवण्यासाठीच भाजपने या क्षेत्रात मतदारसंघ वाढवले आहेत असा आरोप करण्यात आला मात्र निवडणूक आयोगाने त्याची दखल घेतली नाही. आता निवडणूक घोषित झाल्यावर राजकीय पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. या निवडणुकीसाठी काँग्रेस आणि फारुख अब्दुल्ला यांच्या नॅशनल कॉन्फरन्सने आघाडी केली आहे. या आघाडीमुळे जम्मू काश्मीरमध्ये सत्ता स्थापन करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपपुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

भाजपने अद्याप कोणाशी आघाडी केली नसली तरी गुलाम नबी आझाद यांच्या पक्षाशी त्यांची युती होऊ शकते. महेबुबा मुफ्ती यांचा पिपिल्स डेमोक्रेटिक पक्ष हा देखील तेथील एक महत्वाचा पक्ष आहे. तो पक्ष कोणती भूमिका घेतो यावरही बरेच काही अवलंबून आहे. या पक्षाचे आणि नॅशनल कॉन्फरन्सशी विळ्या भोपळ्याचे नाते आहे म्हणून हा पक्ष काँग्रेस आघाडीत अद्याप सामील झाला नाही मात्र या पक्षाचे भाजपशीही पटत नाही. या पक्षाच्या प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांना केंद्र सरकारने नजरकैदेत ठेवल्याचा आरोप या पक्षाने काही दिवसांपूर्वी केला होता त्यामुळे ते भाजपला रोखण्यासाठी काँग्रेस आघाडीत सामील झाला तर आश्चर्य वाटायला नको. याशिवाय आणखी काही छोटे मोठे पक्ष निवडणुकीत उतरू शकतात एकूणच काय तर आगामी महिनाभर नंदनवनात निवडणुकांचे वातावरण असणार आहे. जम्मू काश्मीर मध्ये लोकसभा निवडणुका शांततेत पार पडल्या विशेष म्हणजे मतदार मतदान करण्यासाठी मोठ्या संख्येने घराबाहेर पडले होते.

लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही मतदार भरभरून मतदान करतील आणि लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होतील असा विश्वास निवडणूक आयोगाने व्यक्त केला आहे. असे असले तरी मागील काही दिवसात काश्मीर खोऱ्यात दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे त्यामुळे विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडण्याचे मोठे आव्हान सुरक्षा यंत्रणेपुढे आहे. अर्थात आपली सुरक्षा यंत्रणा त्यासाठी सक्षम आहे हे ही तितकेच खरे त्यामुळे नंदनवनात पुन्हा एकदा लोकशाहीचा उत्सव रंगणार असून या उत्सवात मतदार उत्साहाने सहभागी होणार यात शंका नाही.

- श्याम ठाणेदार, पुणे

# तुका म्हणे, कळे परि होताती आंधळे

कालची घटना विसरून किंवा अगदी सहजपणे नजरेआड करून सिंधुदुर्गातले लोक नेहमीच्याच उत्साहाने दहीहंडी फोडतायत. नेत्यांची मोठमोठी होर्डिंग्ज, कानठळ्या बसवणारे आवाज, नाचगाणी, लाखा लाखाच्या हंड्या... सगळं तेच. हे विस्मरण निव्वळ गतिमान काळामुळे होतंय म्हणायचं की झिंग आणणा-या भवतालामुळे आलेलं बथ्थडपण आहे हे? कुणासाठीच, कशासाठीच आपण थांबू शकत नाही की काहीही थांबवू शकत नाही. थांबवणं शक्य नसेल, समजू शकतो, पण फारशी खंतही जाणवत नाही, हे भयंकर आहे. म्हातारी मेल्याचं दुःख नाही, काळ सोकावतो, म्हणतो आपण. पण तो कधीचाच सोकावला आहे, खरं तर. सोकावलेल्या काळाला आयभैन कुणीच नसतं. इतिहास नि वारसा वगैरे तर फारच दूरच्या गोष्टी झाल्या. त्याला आता पुरती धानाधिस्पटच करायची असेल, नि आपल्याला विरोधात काही ब्रसुद्धा उच्चारायचा नसेल, तर मग कठीणच आहे. किंवा मग तुका म्हणे कळे परि होताती अंधळे, हेच खरं असावं कदाचित.

**- प्रा. प्रविण बांदेकर**
(प्रविण बांदेकर हे साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक आहेत.)






## पत्र मानस

### मुंबई गोवा महामार्ग, चमको गिरी बंद करा

मुंबई-गोवा महामार्ग गणेशोत्सवापूर्वी खड्डेमुक्त होईल' अशी ग्वाही देत माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काम सोडून गेलेल्या कंत्राटदारांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश सोमवारी दिले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री शिंदे यांनी पळस्पे ते कशेडी घाट या १५५ किमी महामार्गाची पाहणी करीत काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या त्या बद्दल समस्त चाकरमन्यांच्या वतीने वतीने जाहीर आभार. महामार्गावरील खड्ड्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे हे ऐकून ऐकून कंटाळा आला आहे आम्हा चाकरमान्यांना .टेक्नॉलॉजी एम ६० आरएफसी व लिओ पॉलिमर, रॅपिडेक्स हार्डनर एम ६० आणि डीएलसी या तीन आधुनिक पद्धतींनी रस्त्यावरील खड्डे यशस्वीरित्या बुजवणे आवश्यक आहे , तसेच लवकरात लवकर मुंबई गोवा महामार्ग लवकरात पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे,' असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. दोषी कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्यात येईल. या कंत्राटदारांकडून चांगले काम करून घेण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात येईल, असे शिंदे यांनी सांगितले. मागील १४ वर्षा पासून किंबहुना त्या पेक्षा जास्त काळ या रस्त्याचे काम चालू आहे. या पूर्वी सुद्धा गणेशोत्सव जवळ आला की विविध राजकीय पक्ष नेते झोपी गेलेले जागे होतात आणि कंत्राटदारावर कारवाई झाली पाहिजे , तर काही लग मुंबई गोवा महामार्ग वर पडलेल्या खड्यात वृक्षारोपण करतातं. आणि मग काही दिवसांनी पालथ्या घड्या वर पाणी परिस्थिती जैसे थे वैसेच . पेण येथे महाविकास आघाडीतर्फे मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखविण्यात आले त्या बद्दल काहीही हरकत नाही परंतु महाविकास आघाडी च्या काळात मुंबई गोवा महामार्ग लवकरात लवकर आणि चांगल्या दर्जाचा करण्यासाठी ते का अपयशी ठरले याचे पहिले त्यांनी आत्मचिन्तन करावे. नंतर काळे झेंडे दाखवीण्याचे सोंग करावी. मागील १४ वर्षांत अनेक मंत्री, ब लोकप्रतिनिधी, खासदारांनी महामार्गाची पाहणी करून नाराजी व्यक्त केली होती. मात्र, हा मार्ग पूर्ण करण्यात अपयश आले. त्यामुळे जनआक्रोश समितीने व माणगाव येथे १५ ऑगस्टपासून सहा दिवस आमरण उपोषण केले होते. तरीही परिस्थिती सुधारणा झाली नाही. आणि दिवसेंदिवस मुंबई गोवा मार्गाच्या कामाला विलंब होत आहे या सारखं दुर्दैव काय असते याचा अनुभव चाकरमनी घेत आहेत. तरी सर्वच राजकीय पक्ष यांनी एकत्र येऊन मुंबई गोवा महामार्ग लवकरात लवकर चांगल्या दर्जाचा कसा होईल आणि आपला चकरामनी त्या रस्त्यावरुन आरामदायक सुखकर प्रवास कसा करेल हा प्रयन करावा , उगाचच मुंबई गोवा महामार्गाच्या निकृष्ट आणि विलंब कामाबाबत चमको गिरी करत बसू नये हि विनंती, विनीत आपला चाकरमनी चुकूभूल दयावी घ्यावी.

**- नितीन कदम दादर मुंबई**

### छत्रपती शिवरायांचा पुतळा पुन्हा उभारा

भारत हा जगात असा एकमेव देश आहे की जिथे मुस्लीम आणि ख्रिस्ती धर्माच्या लोकसंख्येच्या कित्येक पट्टीने हिंदू धर्माचे लोक राहतात विशेष म्हणजे वरील दोन्ही धर्माच्या उगमाचे पावित्र्य स्थान हे परदेशात आहे असे असून देखील दोन्ही धर्माचे लोक भारतात सन्मानाने जगतात कारण ही भूमी आजही छत्रपती शिवाजी महाराजांची म्हणून ओळखली जाते. कोकणातील मालवण राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पत्तीस फुटी पूर्णाकृती पुतळा उभारला गेला होता. नौदल दिनाचे निमित्त साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी महाराजांच्या याच पुतळ्याचे लोकापर्ण केले होते. दुर्दैवाने महाराजांचा हाच पुतळा कोसळला गेला आहे आणि संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट आलेली आहे. राज्यात आणि देशात इतरही महापुरूषांचे पुतळे आहेत पण ते कधी कोसळले नाही मग महाराजांचा पुतळा कसा काय कोसळला कि या मागे काही कारस्थान आहे यासर्वांची सखोल चौकशी झाली पाहिजे. महाराजांचा पुतळा उभारणीच्या निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्याला शिक्षा ही झालीच पाहिजे तसेच आता पत्तीस फूट नव्हे जगातील सर्वात उंचीचा पुतळा उभारण्याचा संकल्प राज्य सरकारने घ्यावा असे शिवप्रेमी या नात्याने नक्कीच वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### भग्न पुतळ्याची छायाचित्रे प्रसारित होणे चुकीचे

मालवणमधील राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना जितकी दुर्दैवी आहे तितकीच ती वेदनादायक आहे. या घटनेवरुन जे राजकारण सुरु झाले आहे तेही चीड आणणारे आहे. साडेतीनशे वर्षापूर्वी स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्येक मराठी माणसाचे आराध्य दैवत आहे. त्यामुळे या दैवताचे शिल्प भग्न होणे हे वाईटच. पण या भग्न शिल्पाची छायाचित्रे समाजमाध्यमावर प्रसारित केली जाणे हे त्याहूनही वाईट. अशी छायाचित्रे प्रसारित करुन आपण छत्रपतींचा अवमानच करतोय याचे भानच संबंधिताना नसावे याचेच वैषम्य वाटतेय.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### महाराष्ट्राची नामुष्की

मालवण राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा २८ फूट उंच पूर्णाकृती पुतळा कोसळल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून संताप व्यक्त जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे राज्याचे आराध्य दैवत आणि अस्मिा आहे. याच महाराष्ट्रात छत्रपतींचा अपमान असा कधी झाला नव्हता. पुतळ्याचा आराखडा,उभारणी आणि संपूर्ण कामाची तसेच निगा राखण्याची जबाबदारी नौदलाची असल्याचा दावा राज्य सरकार करीत जबाबदारी झटकत आहे. त्या पुतळ्याच्या बांधकामाविषयी, शिल्पाविषयी अनेक इतिहासकारांनी आक्षेप घेतले. पुतळ्याच्या दुरवस्थेबाबत स्थानिक नागरीक आणि पर्यटकांनी यापूर्वी चिंता व्यक्त केली होती.त्यावेळी संबंधित यंत्रणेकडून प्रतिबंधात्मक कारवाई का करण्यात आली नाही? हा पुतळा पडल्यामुळे एकूणच महान विभूतींच्या सन्मानार्थ उभारण्यात येणा-या स्मारकांच्या बांधकामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पंतप्रधानांच्या हस्ते अनावरण होणार असल्याने त्या पुतळ्याच्या सर्व बाबी तपासल्या पाहिजे होत्या. पुतळा शतकानुशतके सुस्थितीत आणि सुरक्षित उभारण्याच्या दृष्टीने परिपूर्ण बनवला पाहिजे होता.पुतळा दिमाखाने आणि अधिक मजबुतीने पुन्हा उभारला जाईल पण झालेली नामुष्की परत मिळणार आहे का?

**- विवेक तवटे , कळवा**

### माणसाचं अस्तित्व पैसा

माणसाचं अस्तित्व किंवा कर्तृत्व मोजण्याच आजकाल एकच परिमाण धरलं जातं, ते म्हणजे पैसा. तुम्ही महिन्याला, वर्षाला पैसे किती कमावता इतकेच बघितले जाते. त्यालाच महत्व दिले जाते. याचे कुठेतरी वैषम्य वाटू लागले आहे हल्ली. पैसे हे अत्यावश्यक आहेत, यात काही शंका नाही; परंतु पैशासोबत माणसाने इतर काय कमावले, याकडे सरसकट दुर्लक्ष केले जाते. पैसे मिळवण्यासोबत पुण्याई, मोठ्या माणसांचे आशीर्वाद, कुटुंबातील व्यक्तींचे प्रेम, आदर, हेही कमावले पाहिजे. माणुसकी, मनाचा मोठेपणा, दिलदारपणा, ज्ञान, समंजसपणा, चांगले हस्ताक्षर, उत्तम वक्तृत्व, उत्तम शरीर संपदा याला काहीही महत्त्व राहिले नाही, असे आजच्या लोकांच्या राहणीमानावरून कळते. वय व हातातील काळ उलटून गेल्यावर याची उपरती होते माणसांना. आयुष्यभर कष्ट करूनही निवृत्तीच्या काळात एक रिकामेपणा, उदासीनता वाट्याला येत आहे. याबाबत प्रत्येक माणसाने अत्यंत जाणीवपूर्वक लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

**- सारिका वाडेकर, पुणे**

५ वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, बुधवार, २८ ऑगस्ट २०२४

## द्रोणागिरी शहराची दहीहंडी शिवस्वराज्य गोविंदा पथकाने फोडली

**उरण :** उरण तालुक्यात गोपाळकाला सण मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. विविध गोविंदा पथक उरण मध्ये कार्यरत आहेत त्यापैकी शिवस्वराज्य गोविंदा पथक कोप्रोली हे नामवंत गोविंदा पथक असून शिवसेना द्रोणागिरी शहराची या वर्षाची दहीहंडी शिवस्वराज्य गोविंदा पथक कोप्रोली यांनी फोडली.यावेळी द्रोणागिरी शिवसेना शाखेतर्फे गोविंदा पथकाचा सन्मान करून त्यांना बक्षीस देण्यात आले यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख मनोहरशेठ भोईर, द्रोणागिरी शाखा प्रमुख जगजीवन भोईर यांच्यासह द्रोणागिरी शिवसेना शाखेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.





## म ह त्वा चे

### घाऊक बाजारात लसूण प्रतिकिलो 400 रुपयांवर

**नवी मुंबई :** मागील दोन वर्षांपासून लसणाची लागवड कमी आहे त्याचबरोबर उत्पादनही कमी आहे. त्यामुळे बाजारात कमी आवक होत आहे, परिणामी आवक कमी असल्याने दर गगनाला भिडले आहेत. घाऊक बाजारात प्रतिकिलो १५०-३०० रुपयांवर असलेले लसूण आता २००-४०० रुपयांवर पोहोचले आहेत. महाराष्ट्रातील गावरान तसेच परराज्यातील लसणाच्या लागवडीत गेल्या काही वर्षांपासून घट होत आहे. तसेच मागील वर्षीही लसणाच्या दराने उच्चांक गाठला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी मागील वर्षीचा नवीन लसूण विक्रीसाठी बाहेर काढला होता. त्यामुळे यंदा लसणाची साठवणूक केलेली नाही. त्यामुळे यंदा साठवणुकीचा लसूण कमी आहे. आजमितीला राज्यातील सर्वच बाजार आवारात परराज्यातील आवक घटली आहे.

### भात पिकांवरील रोगाचा प्रतिबंध होण्यास मदत


**उरण :** शनिवारी व रविवारी दोन दिवस उरणच्या शेती क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. ऑगस्ट महिन्यात सलग पंधरा दिवसांचा पावसाचा खंड पडला होता. त्यामुळे उरणमधील शेकडो हेक्टर जमिनीवरील भातपिके संकटात आली होती. मात्र हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार दोन दिवस जोरदार पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे भात शेतीत पाणी वाढल्याने भात पिकांना संजीवनी मिळालेली आहे. अनेक दिवसांपासून पडणाऱ्या कडक उन्हामुळे नागरिक हे उकाड्याने त्रस्त झाले होते. या पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. त्यामुळे उरणच्या नागरिकांनाही दिलासा मिळाला आहे.जुलै महिन्यात झालेल्या जोरदार पावसामुळे उरण तालुक्यातील गावे आणि शहराला तसेच उद्योगांना पाणीपुरवठा करणारे रानसई पुनाडे ही दोन्ही धरणे भरली आहेत. मात्र त्यानंतर ऑगस्ट महिन्यात पहिल्या आठवड्यात काही प्रमाणात पाऊस झाला मात्र त्यानंतर पावसाने दडी मारली.

# वामन म्हात्रेंच्या अटकपूर्व जामिनाला मुंबई हायकोर्टाचा नकार

**प्रतिनिधी**
■ **बदलापूर**

बदलापूरमध्ये दोन लहान मुलींवर शाळेत अत्याचाराची घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण राज्य हादरलं आहे. ही घटना समोर आल्यानंतर बदलापूरच्या नागरिकांनी रस्त्यावर येत रेल्वे सेवा ठप्प केली होती. या घटनेचं वृत्तांकन करणाऱ्या एका महिला पत्रकारासोबत असभ्य वर्तन आणि अपशब्द केल्याचा आरोप असलेले बदलापूरचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांना मुंबई हायकोर्टाने झटका दिला आहे. वामन म्हात्रे यांनी मुंबई हायकोर्टात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. पण त्यांचा अर्ज मुंबई हायकोर्टाने फेटाळला आहे. हा वामन म्हात्रे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जातोय.





वामन म्हात्रे यांच्याविरोधात ॲट्रॉसिटीचा गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी वामन म्हात्रे यांनी मुंबई हायकोर्टात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. पण मुंबई हायकोर्टाने वामन म्हात्रे यांचा अटकपूर्व जामीन नामंजूर केला. मुंबई हायकोर्टाने वामन म्हात्रे यांच्या याचिकेवर सुनावणी करताना त्यांना अटकपूर्व जामीन देण्यास नकार दिला आहे. या प्रकरणात कल्याण न्यायालयाने निर्णय घ्यावा, असे निर्देश मुंबई हायकोर्टाने दिले आहेत. त्यामुळे म्हात्रे यांना कल्याण कोर्टात जावं लागणार आहे.

न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर आज (27 ऑगस्ट) मुंबई हायकोर्टात वामन म्हात्रे यांच्या अटकपूर्व जामिनाच्या याचिकेवर सुनावणी पार पडली. यावेळी हायकोर्टाने कल्याण कोर्टाला 29 ऑगस्टपर्यंत निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, हा निर्णय संध्याकाळपर्यंत मुंबई हायकोर्टाला कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. म्हात्रे यांच्या वतीने वकील विरेश पूरवंत आणि वकील ऋषिकेश काळे यांनी युक्तिवाद केला.

### महिला पत्रकाराशी गैरवर्तन प्रकरणातील निर्णय कल्याण कोर्टाकडे वर्ग

महिला पत्रकाराशी गैरवर्तन केल्याबद्दल वामन म्हात्रे यांच्याविरोधात बदलापूर येथे विनयभंग आणि ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी कल्याण कोर्टात अटकपूर्व जामिनासाठी म्हात्रे यांनी याचिका दाखल केली होती. मात्र, त्यांना अटकेपासून संरक्षण मिळाले नसल्याने त्यांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली. तथापि, मुंबई हायकोर्टाने या टप्प्यावर हस्तक्षेप करण्यास नकार देत, कल्याण कोर्टानेच निर्णय घ्यावा, असे स्पष्ट केले.

# कल्याणमध्ये चक्कीनाक्यावर स्वागत कमानीचा भाग कोसळला



**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

कल्याण पूर्वेतील चक्कीनाका भागात शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक विशाल पावशे यांनी दहीहंडी निमित्त मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर स्वागत कमानीचा फलक लावला होता. जोरदार वाऱ्यांमुळे हा या कमानीचा काही भाग मंगळवारी सकाळी अचानक कोसळला. सुदैवाने कोणतीही हानी झाली नाही.

ही माहिती मिळताच तात्काळ वाहतूक पोलीस, कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दोन दिवसांपासून मुसळधार पावसाबरोबर जोरदार वारे वाहत आहेत. चक्कीनाका भागात शिवसेनेचे माजी नगरसेवक विशाल पावशे यांनी रस्त्याच्यांकडेला स्वागत कमानी उभारल्या होत्या. त्यावर त्यांच्या प्रतीमा आणि गोविंदा पथकांचे स्वागत करण्यात आले होते. स्वागत कमानीचा काही भाग रस्त्यावर पडला. त्याचवेळी मुसळधार पाऊस सुरू असल्याने या रस्त्यावर वर्दळ कमी होती. काही वाहने या भागातून त्या वेळेत जात होती. पण ती काही अंतरावर असल्याने अपघातापासून बचावली.

पोलीस, वाहतूक पोलीस आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी तात्काळ तुटलेल्या कमानीचा भाग रस्त्यावरून हटविला. रस्ता वाहतुकीसाठी खुला केला. विशाल पावशे यांनी आगामी विधानसभा निवडणूक शिवसेना शिंदे गटातून कल्याण पूर्व मतदारसंघातून लढविण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. त्यामुळे कल्याण पूर्वेत सध्या ते विविध प्रकारचे फलक लावून नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

घाटकोपर मधील फलक दुर्घटना घडूनही कल्याण डोंबिवली पालिका प्रशासन बेकायदा फलकांकडे दुर्लक्ष करत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. राजकीय फलकांवर कारवाई केली की राजकीय मंडळी खासगीतून अधिकाऱ्यांना फैलावर घेतात. पालिकेत नगरसेवक म्हणून आलो की बघून घेण्याची धमकी देतात. त्यामुळे अधिकारी वर्ग राजकीय फलकांकडे दुर्लक्ष करत असल्याचे समजते. पालिकेत स्थानिक एकही वजनदार अधिकारी राहिलेला नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींवर धाक ठेवेल, अधिकाऱ्यांचे संरक्षण करील, असा एकही स्थानिक अधिकारी आता पालिकेत राहिला नसल्याने मागील ३० वर्षापासून पालिकेत सेवा करत असलेले कर्मचारी नाराजी व्यक्त करत आहेत.

## भरधाव ट्रकने 5 रिक्षा, 3 दुचाकी उडवल्या

■ **उल्हासनगर**

उल्हासनगरमध्ये एक भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. येथे १७ सेक्शन चौकात एका ट्रक चालकाने रस्त्यावर उभ्या असलेल्या तब्बल पाच रिक्षा आणि अनेक दुचाकी उडवल्याची घटना घडली आहे. ट्रक चालकाचं ट्रकवरील नियंत्रण सुटल्यानं ही घटना घडल्याचं बोललं जातंय. अपघाताची दृश्य सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १७ सेक्शनकडून कल्याणच्या दिशेने एक मालवाहू ट्रक भरधाव वेगाने जात होता. हा ट्रक 17 सेक्शन चौकात येताच चालकाचं ट्रकवरचं नियंत्रण सुटलं आणि त्याने थेट रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या रिक्षा आणि दुचाकींना फरफटत नेत डिव्हायडरला धडक दिली.

रिक्षात प्रवासी नसल्याने जीवितहानी टळली, परंतु एक जण जखमी झाल्याचं बोललं जातंय. या अपघातात पाच रिक्षा आणि काही दुचाकी यांचं मोठं नुकसान झालंय. याप्रकरणी मध्यवर्ती पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेतलं असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

या घटनेचा व्हिडिओही समोर आला आहे. या व्हिडिओत दिसत आहे की, काही रिक्षा आणि दुचाकी रस्त्याच्या कडेला पार्क केल्या आहेत. येथेच जवळ एक व्यक्तीही उभा असल्याचं दिसत आहे. हा व्यक्ती येथून पुढे काहीच अंतरावर गेला असताना मागून अचानक एक भरधाव ट्रक येताना या व्हिडिओत दिसत आहे. व्हिडिओत हा भरधाव ट्रक रस्त्यावर पार्क केलेल्या रिक्षा आणि दुचाकी चिरडत पुढे जाताना दिसत आहे. या अपघातात सीसीटीव्हीत दिसत असलेला व्यक्ती थोडक्यात बचावल्याचं दिसत आहे.

## बदलापूर अत्याचार निषेधार्थ राज ठाकरे आज बदलापूरात

**प्रतिनिधी**
■ **बदलापूर**

यामिनी जाधव शिशु वर्गात शिकणाऱ्या दोन चिमुकल्या मुलींवर शाळेतच झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ ता. २० ऑगस्ट रोजी बदलापूरकरांनी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरुन शाळेसमोर व रेल्वे ट्रॅक वर उतरुन केलेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले. या आंदोलनकर्त्यांच्या कुटुंबाची भेट घेण्यासाठी व घडलेल्या घटनेसंदर्भात तमाम बदलापूरकरांशी संवाद साधण्यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे आज ता. २८ रोजी बदलापूरकरांच्या भेटीसाठी येणार आहेत.



चिमुकल्या मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ २० ऑगस्ट रोजी, झालेल्या आंदोलनात १० तास रेल रोको आणि शाळे बाहेर झालेल्या उत्स्फूर्त आंदोलनात तमाम बदलापूरकर सहभागी झाले. काहींना या प्रकरणात अटक झाली. तर या भीतीपोटी काहींनी घरदार सोडले व अनेक तरुण तरुणी भीतीपोटी बाहेर लपून बसले आहेत. त्यामुळे या सगळ्या आंदोलनकर्त्यांच्या घरात देखील भीतीचे आणि तणावाचे वातावरण आहे.

मात्र अद्याप हे गुन्हे मागे घेतले जात नसल्याने व ज्या आंदोलनकर्त्यांना या आंदोलनात लाठी चार्ज, व त्रास सहन करावा लागला. त्यासाठी या अटक होऊन जामिनावर सुटलेल्या आंदोलनकर्त्यांची व भीतीपोटी घरदार सोडून बाहेर वणवण भटकणाऱ्या आंदोलनकर्त्यांच्या कुटुंबाची होणारी तळमळ लक्षात घेऊन या सगळ्यांची भेट घेण्यासाठी व तमाम बदलापूरकरांशी संवाद साधण्यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे आज ता. २८ रोजी दुपारी १२ वाजता बदलापूर पश्चिम सानेवाडी येथील अदिती बँक्वेट हॉल या ठिकाणी येणार आहेत. आंदोलनकर्त्यांच्या कुटुंबांने व अटक होऊन जामिनावर बाहेर असलेल्या आंदोलनकर्त्यांनी राज ठाकरे यांच्याकडे आपल्या व्यथा मांडण्यासाठी त्यांना भेटण्याचे आवाहन यावेळी मनसे विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित कदम, मनसे शहराध्यक्ष निशांत मांडवीकर, मनसे महिला शहराध्यक्षा संगीता चेंदवणकर यांनी केले आहे



*नवी मुंबई: रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मराठा आघाडी प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब सूर्यकांत मिरजे यांची आई हिराबाई सूर्यकांत मिरजे या आजारी असल्यामुळे त्यांना नवी मुंबईतील वाशी येथील माधव हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. आर पी आय चे अध्यक्ष , केंद्रित सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल रुग्णालयात जाऊन हिराबाई यांच्या तब्येतीची विचारपूस केली. आणि डॉक्टरांशीही सल्ला मसलत केली. बाळासाहेब मिरजे यांचे वडील सूर्यकांत मिरजे यांची चौकशी ना. आठवले साहेबांनी केली या प्रसंगी नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष महेश खरे, प्रदेश उपाध्यक्ष सीताराम मोहाळ, अडवोकेट यशपाल ओहोळ,विजय कांबळे, शीलाताई बोधडे, शशिकलाताई जाधव,द्वारकाताई माघाडे, कविताताई भंडारे, छाया शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.*

# बदलापूरात यंदा दहीहंडी उत्सव रद्द

## अत्याचार घटनेच्या पार्श्वभूमीवर निर्णय

**प्रतिनिधी**
■ **बदलापूर**

दहीहंडी उत्सव सर्वत्र अगदी आनंदात व उत्साहात साजरा केला जात असतो. मात्र बदलापूर शहरात झालेल्या चिमुकल्या मुलींवरील अत्याचाराच्या घटनेनंतर यंदा शहरातील सर्व दहीहंड्याचा उत्सव रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सामाजिक जाणिवेच्या भावनेतून शहरातील दहीहंडी उत्सव रद्द करण्यात आल्याची माहिती उत्सव आयोजकांनी दिली आहे.





बदलापूरमध्ये दोन आठवड्यांपूर्वी दोन चिमुकल्या मुलीवर अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याचे पडसाद राज्यभरात उमटले आहे. या घटनेमुळेच यंदा बदलापूरमध्ये कोठेही दहीहंडी फोडली जाणार नाही. बदलापूर शहरात काँग्रेस शहर अध्यक्ष संजय जाधव यांच्या माध्यमातून दरवर्षी ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची सर्वात मोठी दहीहंडी उभारली जाते. अजय राजा हॉल समोर उभारली जाणारी ही दहीहंडी यावर्षी रद्द करण्यात आली आहे. बदलापूर शहरात घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर सर्वप्रथम संजय जाधव यांनी दहीहंडी रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. यानंतर शहरातील सर्वच लहान मोठ्या दहीहंड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

आजचा दहीहंडी उत्सव रद्द करण्याचा निर्णय आयोजकांनी घेतला आहे. तर दुसरीकडे शहरातील साऊंड असोसिएशनने देखील यावर्षी कुठल्याही कार्यक्रमात डीजे न वाजवण्याचा निर्णय घेतला आहे.

## आसाराम बापू ‘माधवबाग‘मध्ये उपचारासाठी दाखल

**प्रतिनिधी**
■ **खोपोली**

लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापू यांना आज विमानाने उपचारासाठी महाराष्ट्रात पाठवण्यात आले. यावेळी फ्लाइटमध्ये आसाराम बापू हे पोलिसांवर चिडताना दिसले.

आसाराम बापू यांच्यावर महाराष्ट्रातील माधवबाग रुग्णालयात उपचार केले जाणार आहेत. त्यामुळे त्यांना महाराष्ट्रात पाठवले गेले आहे. त्यांच्यासोबत सशस्त्र सैनिकांची तुकडीही पाठवण्यात आलीये. आसाराम बापू यांना काल जोधपूर मध्यवर्ती कारागृहात संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर तुरुंगातून बाहेर आणले गेले. आसाराम बापू यांना 50,000 रुपयांचा बाँड आणि प्रत्येकी 25,000 रुपयांची स्वतंत्र जामीन भरावी लागली. न्यायमूर्ती पुष्पेंद्र भाटी आणि मुन्नरी लक्ष्मण यांच्या खंडपीठाने जोधपूर एम्सच्या वैद्यकीय अहवालाच्या आधारे त्यांना सात दिवसांसाठी पॅरोल मंजूर केला आहे.

## बांधकाम ठिकाणांवरील ध्वनी, वायू प्रदूषण टाळण्याकरिता पालिकेकडून एसओपी जारी

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी बांधकाम व पुनर्विकासाची कामे सुरु आहेत. या कामांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व ब्लास्टिंगच्या अनुषंगाने नागरिकांकडून व लोकप्रतिनिधींकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत असतात.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःहून दाखल करुन घेतलेली Suo Moto जनहित याचिका क्र. 3/2023 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. 11/12/2023 रोजी पारित केलेल्या आदेशानुसार वायूप्रदूषण कमी करण्याबाबत आदेशित केलेले आहे. त्यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने ‘मानक कार्यप्रणाली (SOP)’ तयार करण्याकरिता नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या दि. 24/04/2024 रोजीच्या आदेशान्वये नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर अतिरिक्त आयुक्त (2) श्री. शिरीष आरदवाड यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ सदस्यांची समिती गठित करण्यात आलेली होती.

सदर समितीने विविध बैठका घेऊन तयार केलेल्या नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम परवानगी धारकांनी / विकासकांनी / कंत्राटदारानी अवलंबण्याच्या वायूप्रदूषण, ध्वनीप्रदूषण व एकापेक्षा जास्त खोलीच्या बेसमेंटबाबत उत्खनन / ब्लास्टिंग करताना घ्यावयाच्या खबरदारीबाबत मानक कार्यप्रणाली (SOP) तसेच बांधकाम प्रकल्पांच्या साईटवर होणा-या वायू व ध्वनीप्रदूषण विषयक दंडात्मक कारवाईबाबतच्या प्रस्तावास महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी दि. 26 / 07 / 2024 रोजी, ठराव क्र. 6452 अन्वये मंजूरी दिलेली आहे.

## काँग्रेसचा भाजपला आणखी एक धक्का

# भाजप नेते राजाभाऊ पातकरांचा शेकडो कार्यकर्त्यांसिह काँग्रेसमध्ये प्रवेश

**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मोठे यश मिळाल्यानंतर भाजपासह इतर पक्षातून काँग्रेसमध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. कल्याणमधील भाजपाचे महासचिव व संपर्क प्रमुख राजाभाऊ पाटकर यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव संजय दत्त यांच्या उपस्थितीत रविवारी टिळक भवन येथे काँग्रेस पक्षात प्रवेश केला. नाना पटोले यांनी राजाभाऊ पातकर व कार्यकर्त्यांचे काँग्रेस कुटुंबात स्वागत करुन कल्याणच्या घराघरात काँग्रेसचा विचार पोहचवा असे सांगितले.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस २०१४ साली जनतेला खोटी आश्वासने देऊन सत्तेत आले पण ती त्यांनी पूर्ण केली नसल्याने



जनतेमध्ये भाजपाबद्दल तीव्र संताप आहे म्हणूनच लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला जनतेने भरघोस पाठिंबा दिला व महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष सर्वात मोठा पक्ष झाला. विधानसभा निवडणुकीत प्रत्येक मतदार संघात जाऊन उमेदवाराचा प्रचार करुन काँग्रेस मविआला सत्तेत आणण्याचा प्रयत्न करणार आहे. जिंकण्याच्या उद्देशानेच काम करा व भ्रष्ट युती सरकारला सत्तेतून बाहेर काढा, असे आवाहन नाना पटोले यांनी केले.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव संजय दत्त यावेळी म्हणाले की, नाना पटोले यांच्या रुपाने महाराष्ट्राला एक सक्षम नेतृत्व मिळाले असून काँग्रेस पक्षाची महाराष्ट्रात चांगली कामगिरीत होत आहे. राज्यात काँग्रेस महाविकास आघाडीसाठी चांगले वातावरण आहे.लोकसभा निवडणुकीत जनतेने काँग्रेसला कौल दिला तसाच विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस मविआला चांगले यश मिळून सत्ता येईल पण त्यासाठी काम करा, असे संजय दत्त म्हणाले.

या कार्यक्रमाला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, सचिव संजय दत्त, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, माजी आमदार सुभाष चव्हाण, प्रदेश सरचिटणीस संघटन व प्रशासन प्रमोद मोरे, प्रदेश सरचिटणीस राजन भोसले, ब्रिजकिशोर दत्त, कल्याण डोंबिवलीचे अध्यक्ष सचिन पोटे, प्रदेश सचिव श्रीकृष्ण सांगळे, यशवंत हाप्पे आदी उपस्थित होते.

## मलेरिया, डेंग्यूसह जलजन्य, किटकजन्य व साथरोग आजारांबाबत 24 ठिकाणी विशेष शिबिरांचे आयोजन

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप, डेंग्यू तसेच जलजन्य व साथरोग आजारांबाबत जनजागृती व्हावी आणि या माध्यमातून हे आजार होण्यासाठी खबरदारी घेत प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जाव्यात यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यकक्षेत एकाच वेळी 24 विविध ठिकाणी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

यापूर्वी 4 वेळा आयोजित केलेल्या अशा शिबिरांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला असून आत्तापर्यंत 4 दिवशी, प्रत्येक दिवशी 24 ठिकाणी झालेल्या शिबिरांना




27299 नागरिकांनी भेट दिलेली आहे. या शिबिरांमध्ये नागरिकांचे रक्त नमुने तपासणीची सुविधाही उपलब्ध ठेवण्यात आली असून 1057 नागरिकांची रक्ततपासणी करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांनी दिलेली आहे.

अशाच प्रकारचे विशेष शिबिर दि. 28 ऑगस्ट 2024 रोजी 24 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात सकाळी 10 ते दुपारी 2 या वेळेत आयोजित करण्यात आलेले आहे.

विविध 24 ठिकाणी 28 ऑगस्ट रोजी सकाळी 40 ते दुपारी 2 या वेळेत सर्व तापाच्या रुग्णांचे रक्तनमुने घेण्यात येणार आहेत तसेच हिवताप, डेंग्यू आणि जलजन्य व साथरोग आजारांबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यात येणार आहे.

## महिलेचे तुकडे करून फेकले नदीत, पुण्यातील घटनेने खळबळ

**पुणे :** पुण्यात एका महिलेचे शीर वेगेळे करून तिचे धड नदीपात्रात फेकण्यात आले आहे. या घटनेमुळे पुण्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तिविरोधात गुन्हा दाखल केला आहे.पुण्यात खराडी परिसरात बांधकाम सुरू आहे. याच परिसराजवळ असलेल्या नदीपात्रात एका महिलेचा मृतदेह आढळला. धक्कादायक म्हणजे या महिलेचे शीर धडावेगळे करण्यात आले होते तर तिचे हात आणि पायही कापून फेकण्यात आले होते. पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या महिलेचे वय 18 ते 30 असावे असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या मृत तरुणीची अद्याप ओळख पटलेली नाही. या महिलेला मारून तिचे हात, पाय आणि शरीर धडावगळे करण्यात आले आहेत. ओळख पटू नये आणि पुरावे नष्ट करण्यासाठी आरोपीने असे कृत्य केले असावे असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध सुरू केला आहे. तसेच या महिलेची ओळख पटवण्याचे आव्हानही पोलिसांपुढे आहे.



### महत्त्वाचे

## ब्लॅकमेलिंगला कंटाळून तरुणीने केले विष प्राशन

**अकोला :** अनैतिक संबंध ठेवण्याची धमकी देणाऱ्या तरुणाच्या या रोजच्या जाचाला कंटाळून मुलीने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केलाय.अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातून हा प्रकार समोर आलाय. पीडित तरुणी ही मूर्तिजापूर येथे शिक्षण घेण्यासाठी यायची. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत ही तरुणी महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. पण तरुणाच्या त्रासाला कंटाळल्याने तिच्यावर जीव देण्याची वेळ आली आहे. तरुणीने विष प्राशन केल्याची वार्ता कळताच सर्वत्र एकच खळबळ उडाली. तात्काळ उपचारासाठी मुलीला मुर्तीजापुर येथे दाखल करण्यात आले होते. येथे तिने आपला जबाब पोलिसांत नोंदवला होता. यानंतर तिला अकोल्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांना दिलेल्या जबाबत तिने आरोपी मुलगा माझा नेहमी मानसिक छळ करायचा असा आरोप केला होता. असे असले तरी स्थानिक पोलिसांनी अद्यापही याप्रारकणात चौकशी करून गुन्हे दखल केले नाहीत, असा गंभीर प्रकार समोर आलाय. त्यामुळे मुलीला न्याय मिळावा अशी मागणी वडिलांनी केली आहे.

## ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांचं निधन



**पुणे :** १०० हून अधिक चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारलेल्या मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांचं आज निधन झालं. त्यांच्या जाण्याने कलासृष्टीवर शोककळा पसरली आहे. दमदार अभिनय कौशल्यानं त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर छाप सोडली. मात्र आज त्यांच्या जाण्याने चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.देवकीनंदन गोपाला, पुढचं पाऊल, वारसा लक्ष्मीचा, काळूबाईच्या नावानं चांगभलं, आज झाले मुक्त मी, धग, माहेरचा आहेर, गड जेजुरी, आम्ही दोघे राजा राणी, बाईसाहेब, मानाचं कुंकू मानाचा हे त्यांचे गाजलेले चित्रपट. तसंच तुझं आहे तुझ्या पाशी, बेल भंडार, कथा अकलेच्या कांद्याची, सुनबाई घर तुझंच आहे, राजकारण गेलं चुलीत, चिरंजीव आईस, सासूबाईचं असंच असतं, लग्नाची बेडी अशा नाटकांचे हजारो प्रयोग त्यांनी केले आहेत.

# महायुतीकडून महाराजांचा अपमान माफी मागत सरकारने राजीनामा द्यावा

## सतेज पाटलांची मागणी

प्रतिनिधी
■ मालवण

सिंधुदुर्ग किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणे, हे अतिशय दुर्दैवी आहे. मात्र त्याचे खापर नेव्हीवर फोडून नेव्हीला बदनाम करू नका. चूक झाली असेल तर शासनाने माफी मागितली पाहिजे, असे म्हणत काँग्रेस नेते आमदार सतेज पाटील यांनी सरकारवर टीका केली आहे. या घटनेची जबाबदारी घेऊन राज्य सरकारने राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी देखील त्यांनी केली. सिंधुदुर्ग किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोसळलेल्या पुतळयाची पाहणी त्यांनी केली, त्यावेळी ते बोलत होतो.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यासाठी तसेच याचा इव्हेंट करण्यासाठी इतकी गडबड केली गेली का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत देखील सरकार असे करते, हे खरेच दुर्दैव असल्याचे ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाची अवस्था बघितल्यानंतर आज वेदना होत आहेत. पुतळा तयार करताना योग्य खबरदारी घेतली नाही, हे आज दिसून येत असल्याचे देखील ते म्हणाले. केवळ निवडणुकीआधी अनावरण करण्यासाठीच अनुभव नसणाऱ्या लोकांना हे तर काम दिले गेले, असा आरोप देखील त्यांनी केला आहे.

आपटे नावाच्या व्यक्तीला हे काम देण्यासंदर्भात नेव्हीला कोणी सांगितले? कोणत्याही शास्त्रात न बसणारे नियोजन या पुतळयाच्या बाबतीत केले गेले, असा आरोप देखील सतेज पाटील यांनी केला आहे. चूक झाली असेल तर शासनाने माफी मागावी. मात्र नेव्ही वर ढकलू नये, नेव्हीला बदनाम करू नका, स्वतःचे पाप दुसऱ्यावर ढकलण्याचे काम हे सरकार करत असल्याची घनाघाती टीका देखील सतेज पाटील यांनी केली आहे.

पुन्हा उभारला जाणारा पुतळा हा महाविकास आघाडी सरकारकडूनच उभारा जावा, अशी छत्रपती शिवाजी महाराजांची इच्छा असेल. आता ती आमची जबाबदारी असल्याचे देखील सतेज पाटील यांनी म्हटले आहे. महायुती सरकार हे महागळती सरकार आहे. राम मंदिर, विमानतळ, संदसद भवन या ठिकाणी गळतीच्या घटना घडल्या आहेत. आता तर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा देखील पडला आहे. ही घटना संतापजनक आणि महाराष्ट्राला मागे नेणारी घटना असल्याचे सतेज पाटील यांनी म्हटले आहे.

## शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या अपमानाविरोधात राष्ट्रवादीचे सिंधुदुर्गात आज आंदोलन



प्रतिनिधी
■ मालवण

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्याच्या घटनेनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापलं असून विरोधकांनी यावरून राज्य सरकारला धारेवर धरले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) आंदोलनाच्या पावित्र्यात आहे. पक्षाने एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे, शिवछत्रपतींच्या पुतळयाच्या झालेल्या अपमानाविरोधात राष्ट्रवादी (शरद पवार गट) मैदानात, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उद्या (२८ ऑगस्ट) घटनास्थळी जाणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने म्हटलं आहे की "हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळयाचे घाईगडबडीत केलेले अनावरण हे स्वराज्याच्या स्वाभिमानाला ठेच पोहचवणारे ठरले आहे. काल सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्यावरील शिवरायांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला. या घटनेचा निषेध नोंदविण्यासाठी नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी थेट घटनास्थळी जाऊन याविरोधी आंदोलनाचा पुकारा दिला आहे. उद्या (२८ ऑगस्ट २०२४) सकाळी ११.०० वाजता सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्याजवळ हे आंदोलन करण्यात येईल".

शरद पवार गटाने म्हटलं आहे की "महाराष्ट्राच्या आराध्य दैवताच्या पुतळयाची पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटनाची एवढी घाई का करण्यात आली? तसेच या घटनेशी संबंधित सर्व अधिकारी, कंत्राटदार व इतर यंत्रणेच्या बेजबाबदारीचा जाब या आंदोलनाच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांना विचारण्यात येणार आहे. यासह पक्षाच्या वतीने सर्व राज्यभरात या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी स्थानिक पातळीवर आंदोलन करण्याचं आवाहन देखील करण्यात आलं आहे".समाजवादी पार्टीचे प्रमुख व उत्तर प्रदशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी म्हटलं आहे की "भाजपाने आतापर्यंत ज्या-ज्या वास्तूंची, स्मारकांची निर्मिती केली आहे त्या केवळ भ्रष्टाचाऱ्यांना भेट म्हणून बनवल्या आहेत. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचं अनावरण केलं होतं. तो पुतळा कोसळणं ही खूपच वेदना देणारी व दुर्दैवी घटना आहे.

## पुतळा कोसळण्याच्या घटनेची एसआयटी चौकशी करा

### सिंधुदुर्ग मराठा महासंघाची मागणी

प्रतिनिधी
■ कुडाळ

मालवण राजकोट परीसरात उभारण्यात आलेला छत्रपती शिवरायांचा पुतळा २६ ऑगस्ट रोजी कोसळल्याची घटना घडली. महाराष्ट्राला काळीमा लावणारी ही घटना आहे. सदर घटनेचा सिंधुदुर्ग मराठा महासंघाने निषेध करण्यात केला आहे . मात्र महाराजांच्या या पुतळयाची डागडुजी जुन महिन्यातच झाली होती अशी माहिती पुढे आली आहे.त्यामुळे या पुतळा कोसळण्याच्या घटनेची एस आय टी चौकशी करण्याची मागणी सिंधूदुर्ग मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अँड.सुहास शां. सावंत यांनी केली आहे.


छत्रपती शिवरांयाच्या पुतळयाबाबतच्या वस्तुस्थितीची जाणीव करून दिलेली दिसून येते. त्याचप्रमाणे शासनाने सदर कामी चौकशी करण्याकरीता स्वतंत्र एस आय टी नेमून त्यात जे.जे स्कूल ऑफ आर्ट कॉलेज मधील शिल्पकलेतील तज्ञ व्यक्ती तसेच आयआयटी मुंबई मधील धातू शास्त्र तज्ञांचा समावेश असलेली समिती स्थापन करावी. जर शासनाने अशी समिती स्थापन न केल्यास याबाबत मराठा महासंघ, सिंधुदुर्ग उच्च न्यायालयात दाद मागणार आहे. असेही अँड सुहास शां. सावंत यांनी म्हटले आहे.

## पुतळा दुर्घटनेसंदर्भात ठाकरेंचे आमदार कायदेशीर लढा देणार

प्रतिनिधी
■ मालवण

सिंधुदुर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्यानंतर विरोधकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. कोकणातील शिवसेना ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी चक्क तेथील सार्वजनिक बांधकाम कार्यालयात जाऊन तोडफोड केली होती. निकृष्ट दर्जाचा पुतळा बसवल्याचा आरोप करत पालकमंत्री रविंद्र चव्हाण आणि राज्य सरकारवर जोरदार टीका केली. आता, पुतळा दुर्घटनेची आपण कायदेशीर लढाई लढणार असल्याचंही वैभव नाईक यांनी म्हटलं. दरम्यान, सरकारी कार्यालयातील तोडफोडप्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हा देखील दाखल झाला आहे. मात्र, आता वकील असीम सरोदे यांनी मदत घेऊन ते






याप्रकरणात कायदेशीर लढा देणार असल्याचं पत्रच त्यांनी असीम सरोदे यांना पाठवलं आहे.

जिल्ह्याच्या मालवण येथील राजकोट किल्ल्यावर केवळ 9 महिन्यांपूर्वी उभारलेला आणि पंतप्रधान मोदी महाराष्ट्रात सध्या असलेले मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत अनावरण करण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा निकृष्ट दर्जाची उभारणी असल्याने कोसळला आणि समस्त महाराष्ट्रातील जनता व्यथित झाली. आज सुरु असलेला भ्रष्टाचार व पराकोटीचे स्वार्थी राजकारण यांनी महाराजांची प्रतिष्ठा सुद्धा मालिन केलीच आहे.

## रत्नागिरीतील लैंगिक अत्याचारप्रकरणी विशेष पथक नियुक्त

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

रत्नागिरीत सोमवारी तरुणीवर झालेल्या लैंगिक अत्याचारप्रकरणी पोलिसांचे विशेष तपास पथक नियुक्त करण्यात आले आहे. वेगवेगळया अंगांनी या प्रकरणाचा तपास केला जात आहे. पोलिस अविश्रांत हा तपास करत आहेत. त्यामुळे लवकरच ठोस माहिती हाती येईल, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी मंगळवारी पत्रकारांना दिली.



शिकाऊ परिचारिका म्हणून काम करणाऱ्या रत्नागिरीतील एका तरुणीवर सोमवारी सकाळी लैंगिक अत्याचार झाले. रात्रीच पोलिसांनी काही जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी चार ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून, त्याआधारे तपास केला जात आहे. या प्रकरणाचा तपास अधिक जलद गतीने व्हावा तसेच यातील सर्व बारकावे तपासात पुढे यावेत, यासाठी पोलिसांच्या विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. पोलिस निरीक्षक स्मिता सुतार या पथकाच्या प्रमुख असून, या पथकामध्ये तीन महिलांसह ११ पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे, असे पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी सांगितले.

## पेशवा घराण्याचे 9वे वंशज डॉ. उदयसिंह पेशवा यांचं निधन



■ पुणे

पेशवा घराण्याचे नववे वंशज आणि श्री देवदेवेश्वर संस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त डॉ. विनायक विश्वनाथ उर्फ उदयसिंह पेशवा (वय ८६) वृद्धापकळाने निधन झालं. वैकुंठ स्मशानभूमीमध्ये रात्री उशीरा त्यांच्या पार्थिवावर अत्यंसंस्कार करण्यात आलं. उदयसिंह पेशवा यांच्या मागे पत्नी जयमंगलाराजे पेशवा, एक मुलगा आणि दोन मुली असा परिवार आहे. उदयसिंह पेशवा हे पेशव्यांचे नववे वंशज होते. उदयसिंह पेशवा हे गेल्या ५७ वर्षांपासून श्री देवदेवश्वर संस्थानचे विश्वस्त होते. पेशवा यांनी हॉलंडमधून भूगर्भशास्त्र या विषयातील उच्चशिक्षण पूर्ण केलं होतं. पीएचडीनंतर ते पुण्यात आले. अनेक वर्ष ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये ते भूगर्भशास्त्र विभागाचे प्रमुख होते.

## घरांच्या प्रश्नावरुन गिरणी कामगार संघटनेच्या बैठकीत सरकारवर नाराजी

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

मुंबईतील गिरणी बंद होवून जवळपास ४२ वर्ष उलटून गेली. सरकारने घरं देणार म्हणून घोषणा, निर्णय घेतला आहे. मात्र कामगारांना घरे बांधून देण्याबाबत सरकार टोलवाटोलवी करत असल्याने हयातीत घरे मिळण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे सरकारने घरा ऐवजी प्रत्येक कामगाराला ८० लाख रुपये द्यावे आणि ज्यांना घरं पाहिजे त्यांना घरे बांधून द्यावीत अशी अपेक्षा सिंधुदुर्ग गिरणी कामगार संघटनेच्या बैठकीत कामगारांनी व्यक्त केली.सिंधुदुर्ग गिरणी कामगार संघटनेची बैठक काझी शहाबुद्दीन हॉल येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी अध्यक्ष शामसुंदर



कुंभार, खजिनदार लॉरेन्स डिसोझा, रामचंद्र कोठावळे, सुभाष परब, विश्वनाथ कुबल,अभिमन्यू लोंढे, सुमन मुळीक, घनश्याम शेटकर आदी उपस्थित होते.

गिरणी कामगारांना शिल्लक असलेला व्हीआरएस मिळणार आहे. त्यांनी राष्ट्रीय मिल मजदुर संघाच्या कार्यालयात संपर्क साधावा. तसेच घरांची सोडत निघणार आहे. पण तारीख पे तारीख दिली जात आहे. मुंबईत मोक्याच्या ठिकाणी घरं मिळतील त्यांची किंमत पाहता ज्यांना घरं नको त्यांना प्रत्येकी ८० लाख रुपये द्यावे आणि घरं पाहिजे त्यांना घरे बांधून द्यावीत अशी मागणी आज करण्यात आली. या मागणीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री दिपक केसरकर, पालकमंत्री रवींद्र चव्हाण, खासदार नारायण राणे, राष्ट्रीय मिल मजदुर संघ आदींना निवेदन द्यावे असे ठरविण्यात आले.

## वर्दीत दारु पिऊन हाणामारी करणाऱ्या पोलिसावर कारवाई, मात्र गुन्हा दाखल नाही

प्रतिनिधी
■ जळगाव

जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी असणाऱ्या पोलिसांनी दारु पिऊन जळगावात धिंगाणा केला होता. पोलिसामधील हाणामारीचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. जळगाव पोलीस दलातील कर्मचाऱ्याने वर्दीत बारमध्ये मद्यपान केले. त्यानंतर बारबाहेर येऊन हाणामारी केली. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी चौकशी केली. त्यात दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यावर निलंबनाची



कारवाई केली. पोलिस कॉन्स्टेबल संदीप धनगर असे त्याचे नाव आहे. परंतु या प्रकरणी कोणताही गुन्हा दाखल नाही. कारण यासंदर्भात कोणाची तक्रार नाही, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

जळगावात गणवेशातच हॉटेलात मद्यपान करून दारूच्या नशेत हाणामारी करण्याचा प्रकार घडला होता. मुक्ताईनगर पोलिस ठाण्याचे पोलिस कॉन्स्टेबल संदीप धनगर हा या प्रकारात दोषी आढळून आला आहे. त्यामुळे जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी संदीप धनगर याच्या निलंबनाचे आदेश काढले.

गणवेशातच बसून तर्रर झालेल्या पोलिसांमध्ये जोरदार वाद झाले होते. दोन पोलिसांमधील हाणामारीचा हा व्हिडिओ समोर आला.

## तरुणाच्या त्रासाला कंटाळून 15 वर्षीय विद्यार्थिनीची आत्महत्या

■ नाशिक

नाशिकमधील देवळाली गावात एका १५ वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची घटना घडली. एकतर्फी प्रेम करणाऱ्या तरुणाच्या त्रासाला कंटाळून या विद्यार्थिनीची आत्महत्या केल्याचं म्हटलं जातंय. या घटनेचा एक सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाला असून या प्रकरणाला घातपाताची किनार असल्याची शक्यता आहे. या व्हायरल व्हिडिओमुळे ही आत्महत्या होती की घातपात असा संशय व्यक्त केला जात आहे.

सीसीटीव्हीच्या फुटेजमध्ये दुचाकीवर एक मुलगा आणि एक मुलगी दिसत आहे. मुलाच्या पाठिमागे बसलेल्या मुलीने त्या दोघांच्या मध्ये बसलेल्या एकाला दोन्ही हातांनी धरले असल्याचं दिसत आहे. याप्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

# खासदार वसंतराव चव्हाण अनंतात विलीन

## शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

प्रतिनिधी
■ नांदेड

काँग्रेसचे जेष्ठ नेते, नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण यांचं सोमवारी (26 ऑगस्ट) सकाळी निधन झालं. श्वास घेण्यास त्रास होत असल्यानं वसंतराव चव्हाण यांच्यावर हैदराबादमधील किम्स रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. वयाच्या 70 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

वसंतराव चव्हाण यांच्यावर आज (27 ऑगस्ट) नांदेडमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, नितीन राऊत तसंच भाजपाचे अशोकराव चव्हाण, नांदेडचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यासह नांदेडचे स्थानिक नेते, काँग्रेस कार्यकर्ते आणि चव्हाण यांचे समर्थक उपस्थित होते.




राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी चव्हाण यांना राज्य शासनामार्फत पुष्पचक्र अर्पण करत श्रद्धांजली वाहिली. मंत्री महोदयांसोबत शासनामार्फत विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शाहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, नांदेड महानगरपालिकेतील आयुक्त डॉ. महेश डोईफोडे यांनी पुष्पचक्र अर्पण केले. पोलीस दलातर्फे हवेत तीन फैरी झाडून त्यांना अंतिम सलामी देण्यात आली.

ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी काँग्रेस सोडून भाजपात प्रवेश केल्यामुळं काँग्रेसचं काय होणार अशी चर्चा सुरू झाली. अशात लोकसभा निवडणूक मी पूर्ण ताकदीनं लढणार असल्याचं जाहीर करुन वसंतराव यांनी प्रताप पाटील चिखलीकर यांचा पराभव केला. खासदार म्हणून निवडून येण्याअगोदर ते एकदा विधानपरिषदेचे तर दोनदा विधानसभेचे आमदार होते. त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात गावच्या सरपंचपदापासून झाली. 1978 ते 2002 अशी सलग 24 वर्ष ते सरपंच पदावर होते. नंतर पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, 16 वर्षे आमदार आणि 2024 मध्ये ते लोकसभा सदस्य झाले होते. शांत आणि संयमी अशी त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनानं नांदेडवर शोककळा पसरली आहे.

## भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये राडा

### तहसील कार्यालयातच हाणामारी

प्रतिनिधी
■ जालना

जालन्याच्या जाफराबादमध्ये तहसील कार्यालयात बेदम हाणामारीचा प्रकार समोर आला आहे. युवक काँग्रेस कार्यकर्त्याला भाजप युवक कार्यकर्त्याने मारहाण केली आहे. संबंधित घटना कॅमेऱ्यात कैद करण्यात आली. तसेच या घटनेचा व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे तहसील कार्यालयातच हा सर्व प्रकार घडल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. तहसील कार्यालयात हा प्रकार घडला तेव्हा तिथले पोलीस किंवा सुरक्षा रक्षक कुठे होते? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

गौण खजिनाचं अवैध उत्खनन केल्याची तक्रार केल्याने ही मारहाण करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. भाजप माजी जिल्हा परिषद सदस्याच्या मुलाकडून



मारहाण करण्यात आली. या व्हिडीओत भाजपचा कार्यकर्ता काँग्रेसच्या कार्यकर्त्याला प्रचंड मारहाण करताना दिसतोय. संबंधित व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होतोय. या घटनेवर आता भाजपकडून काय प्रतिक्रिया देण्यात येते ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

याप्रकरणी महत्त्वाची अपडेटही समोर आली आहे. सागर लोखंडे या भाजप कार्यकर्त्या विरुद्ध जाफराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जालन्यातील जाफराबाद तहसील कार्यालयामध्ये काँग्रेसच्या कार्यकर्त्याला भाजपच्या युवक कार्यकर्त्याने बेदम मारहाण केली होती. या मारहाणीचा व्हिडिओ समोर आला होता. गौण खनिजाच अवैध उत्खनन केल्याची तक्रार दिल्याने, भाजपच्या सागर लोखंडे याने काँग्रेस कार्यकर्ता प्रमोद फदाड या तक्रारदारास मारहाण केली होती. मारहाण करणाऱ्या भाजपा कार्यकता सागर लोखंडेसह त्याच्या सहकाऱ्यांवर विरुद्ध जाफराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

## दिव्यात 31 ऑगस्टला भव्य 'वर्षा मॅरेथॉन '

**दिवा :** सालाबाद प्रमाणे दिव्यात येत्या ३१ ऑगस्टला भव्य वर्षा मॅरेथॉन स्पर्धेच आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना दिवा शहर व ठाणे जिल्हा अँथलेटिक्स संघटनेच्या वतीने सदर स्पर्धेच आयोजन करण्यात आले असून यंदा स्पर्धेचे ५ वे वर्ष आहे. सदर मॅरेथॉन स्पर्धा दि. ३१/०८/२०२४ सकाळी ७ वा. दिवा महोत्सव मैदान, दिवा (पूर्व) येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर भव्य वर्षा मॅरेथॉन स्पर्धा इयत्ता ४ थी ते ६ वी १ किलो मिटर, इयत्ता ७ थी ते ८ वी १.५ किलो मिटर, इयत्ता ९ वी ते १० वी २ किलो मिटर तर खुलागटासाठी ५ किलो मिटरचे अंतर असणार असून सदर स्पर्धा दिवा आगासन रोड येथे पार पडणार आहे. दिवा वर्षा मॅरेथॉन स्पर्धा २०२४ मधील चारही गटातील विजेत्यांना आकर्षक स्मृतीचिन्ह देण्यात येणार असून अधिक माहितीसाठी आयोजकांकडून सदर स्पर्धेत भाग घेण्यासाठी मो. ८४५२००८६७८ संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## संत ज्ञानेश्वर चषक जिंकण्यासाठी शालेय 64 कॅरमपटूमध्ये चुरस




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

ज्ञानेश्वर विद्यालय-वडाळा व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे सुमती सेवा मंडळ-दहिसर सहकार्याने राष्ट्रीय क्रीडा दिन-२९ ऑगस्ट निमित्त होणाऱ्या संत ज्ञानेश्वर चषक शालेय मोफत कॅरम स्पर्धेत ६४ खेळाडूमध्ये चुरस असेल. १६ वर्षाखालील व इयत्ता १० वीपर्यंतच्या शालेय मुलामुलींच्या विनाशुल्क कॅरम स्पर्धेत मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर, रायगड व रत्नागिरी आदी जिल्ह्यातील शालेय कॅरमपटू सहभागी होणार आहेत.

सार्थक केरकर, निधी सावंत, स्वरा मोहिरे, श्रीशान पालवणकर, प्रसन्ना गोळे, साहिल वाघेला, सुशांत कदम, गौरांग मांजरेकर, हर्षद चव्हाण, अथर्व आरकर, तन्वी कांबळे, वेदांत पाटणकर, देविका जोशी, उमर पठाण, अर्णव गावडे, याद्रेश देवरा आदी खेळाडू स्पर्धा गाजविण्यासाठी उत्सुक आहेत. शालेय खेळाडूंना डीएसओ व इतर शालेय कॅरम स्पर्धेअगोदर सामन्यांचा सराव मिळावा, म्हणून चँम्पियन कॅरम सेटवर वडाळा-पश्चिम येथील ज्ञानेश्वर विद्यालयात विनाशुल्क स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धकांना नामवंतांचे मोफत मार्गदर्शन देखील लाभणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन क्रीडाप्रेमी भास्कर सावंत व प्रमोद पार्टे यांच्या हस्ते तर पारितोषिक वितरण ज्ञानेश्वर विद्यालयाचे सचिव सुर्यकांत कोरे व मुख्याध्यापक महेंद्र पाटील, आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

## T20 विश्वचषकासाठी भारतीय संघ जाहीर, हरमनप्रीत कौरकडे नेतृत्व

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

संयुक्त अरब अमिराती येथे ३ ते २० ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या महिला ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा झाली. महिला ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेचे सामने दुबई आणि शाहजाह येथे खेळवले जाणार आहेत.

सहावेळा वर्ल्ड कप उंचावणाऱ्या ऑस्ट्रेलियासमोर अ गटात २०२०च्या उपविजेत्या भारत, न्यूझीलंड, पाकिस्तान आणि श्रीलंका यांचे आव्हान असणार आहे. ब गटात दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, २०१६चा चॅम्पियन वेस्ट इंडिज, बांगलादेश व स्कॉटलंड हे समोरासमोर असतील. या स्पर्धेत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ जेतेपद जिंकण्यासाठी मैदानावर उतरणार आहे.

श्रीलंका आणि स्कॉटलंड हे आयसीसी महिला ट्वेंटी-२० वर्ल्ड कप पात्रता फेरीतून मुख्य स्पर्धेत दाखल झाले आहेत.



प्रत्येक संघ गटात चार सामने खेळतील आणि अव्वल दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. १७ व १८ ऑक्टोबरला उपांत्य फेरीचे सामने होणार आहेत. २० ऑक्टोबरला फायलन दुबईत होईल आणि उपांत्य फेरी व अंतिम सामन्यासाठी राखीव दिवस आहेत. भारतीय संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरल्यास ते Semi-final 1 मध्ये खेळतील. एकूण २३ सामने खेळवले जाणार आहेत. २८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत १० सराव सामने होतील.

**भारतीय महिला संघ**

*हरमनप्रीत कौर ( कर्णधार), स्मृती मानधना ( उप कर्णधार), शफाली वर्मा, दीप्ती शर्मा, जेमिमा रॉड्रीग्ज, रिचा घोष ( यष्टिरक्षक), यास्तिका भाटीया (यष्टिरक्षक), पूजा वस्त्राकर, अरुंधती रेड्डी, रेणुका सिंग, दयालन हेमलथा, आशा शोभना, राधा यादव, श्रेयंका पाटील, संजना संजीवन राखीव खेळाडू - उमा चेत्री, तनुजा कनवर, सैमा ठाकोर.*

**भारतीय संघाचे वेळापत्रक**

*४ ऑक्टोबर, शुक्रवार - भारत विरुद्ध न्यूझीलंड, दुबई६ ऑक्टोबर, रविवार - भारत विरुद्ध पाकिस्तान, दुबई९ ऑक्टोबर, बुधवार - भारत विरुद्ध श्रीलंका, दुबई१३ ऑक्टोबर, रविवार - भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया, शारजा१७ ऑक्टोबर, गुरुवार - उपांत्य फेरी १, दुबई१८ ऑक्टोबर, शुक्रवार - उपांत्य फेरी २, शारजाह२० ऑक्टोबर, रविवार - फायनल, दुबई.*

## आनंद, बाळकृष्ण जोडी विजेती

■ **मुंबई**

नुकत्याच गोरेगाव स्पोर्ट्स क्लब येथे बॅडमिंटन असोसिएशन मुंबई उपनगरच्या वतीने 110 वयोगटा वरील दुहेरीच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये आनंद विठ्ठलकर व बाळकृष्ण पी.एम यांनी दुहेरीचे विजेतेपद पटकावले.

त्यांनी उपांत्य फेरीत डॉक्टर झूबेर सोयाथीया, माणिक दारूवाला जोडीचा 21 - 14 , 21 -14 असा दोन गेममध्ये सहज पराभव करून




अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीमध्ये आनंद, बाळकृष्ण जोडीने अशोक शर्मा, महेश छाब्रियाचा 21 - 19 , 21- 14 दोन गेममध्ये आरामात पराभव करून 110 वयोगटा वरील "दुहेरीचे विजेत पद" संपादन केले.

विजेत्या जोडीस रुपये 6000/- चा धनादेश, अविनाश धर्माधिकारी अध्यक्ष बॅडमिंटन असोसिएशन मुंबई उपनगर, सौ. राखी सोनिग्रा, संयुक्त सचिव गोरेगाव स्पोर्ट्स क्लब यांच्या हस्ते देण्यात आला.

## देशांतर्गत क्रिकेटमध्येही मिळणार सामनावीर पुरस्कार

### विजय हजारे, मुश्ताक अली आणि महिलांच्या स्पर्धेत बक्षीस रक्कम देणार



**वृत्तसंस्था**
■ **नवी दिल्ली**

भारतात देशांतर्गत क्रिकेट खेळणे अधिक फायदेशीर होत आहे. आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (BCCI) चे सचिव जय शाह यांनी जाहीर केले की सर्व देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांमध्ये सामनावीर आणि टूर्नामेंटमधील सर्वोत्तम खेळाडूसाठी बक्षीस रक्कम दिली जाणार आहे. यापूर्वी केवळ रणजी करंडक आणि दुलीप करंडक यांसारख्या मोठ्या स्पर्धांमध्येच टूर्नामेंटमधील सर्वोत्तम खेळाडूला एक लाख रुपयांचे बक्षीस दिले जात होते. पण आता पुरुषांबरोबरच महिला क्रिकेटच्या देशांतर्गत स्पर्धांमध्येही पैसे दिले जाणार आहेत.

बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनी सोमवारी रात्री उशिरा ८ वाजता सोशल मीडियावर एक पोस्ट केली. त्यात त्यांनी लिहिले की, 'आतापासून बीसीसीआयच्या देशांतर्गत क्रिकेट कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या सर्व महिला आणि ज्युनियर क्रिकेट स्पर्धांमध्ये 'प्लेअर ऑफ द मॅच' आणि 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट'ला बक्षीस रक्कम दिली जाईल. सिनियर पुरुष विजय हजारे आणि सय्यद मुश्ताक अली यांनाही स्पर्धेतील सामन्यातील सर्वोत्तम कामगिरीसाठी बक्षीस रक्कम दिली जाईल. जय शहा यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सांगितले की, आता देशांतर्गत क्रिकेटमध्ये प्लेअर ऑफ द मॅचचा पुरस्कार दिला जाईल.शहा यांनी पुढे लिहिले की, 'देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगल्या कामगिरीचे बक्षीस देणे महत्त्वाचे आहे, पुरस्कार संस्कृती लक्षात घेऊन हा उपक्रम सुरू केला जात आहे.

आम्हाला एकत्रितपणे देशातील क्रिकेटपटूंसाठी पुरस्कार देणारी संस्कृती वाढवायची आहे. दुलीप करंडक ५ सप्टेंबरपासून भारताचा देशांतर्गत क्रिकेट हंगाम 5 सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. त्याची सुरुवात दुलीप करंडक या ४ संघांमधील ४ दिवसीय सामन्यांच्या स्पर्धेने होईल. त्यानंतर ११ ऑक्टोबरपासून सर्व राज्यांमध्ये प्रथम श्रेणी रणजी करंडक स्पर्धा सुरू होईल. दरम्यान, एकदिवसीय स्पर्धा विजय हजारे आणि टी-२० स्पर्धा सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीचेही आयोजन केले जाणार आहे असे शहा यांनी सांगितले.

## मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन युनिफाइड पेन्शन योजना

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

केंद्रीय मंत्रिमंडळाने २४.०८.२०२४ रोजी युनिफाइड पेन्शन स्कीम (यूपीएस) मंजूर केले, जे . ०१.०४.२०२५ पासून लागू होणार आहे आणि २३ लाख केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.मध्य रेल्वेमध्ये, आजपर्यंत ९६,०३९ कर्मचारी आहेत आणि ७०,७७८ कर्मचारी म्हणजे ७३.६९% जे नवीन पेन्शन योजनेचे सदस्य आहेत त्यांना याचा लाभ मिळण्याची शक्यता आहे.

नवीन पेन्शन योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी मध्य रेल्वेचे सध्याचे योगदान दरमहा ४५.५ कोटी आहे (नियोक्त्याच्या १४% योगदानानुसार).

यूपीएसची प्रमुख वैशिष्ट्ये

१.खात्रीशीर पेन्शन: २५ वर्षांच्या किमान पात्रता सेवेसाठी सेवानिवृत्त होण्यापूर्वीच्या मागील १२ महिन्यांत मिळालेल्या सरासरी मू वेतनाच्या ५०% असेल. किमान १० वर्षांच्या सेवेसह कमी सेवा कालावधीसाठी प्रमाणात.

२. निश्चित कुटुंब निवृत्ती वेतन: कर्मचाऱ्याला तिच्या/ त्याच्या मृत्यूपूर्वी मिळणाऱ्या निवृत्तीवेतनाचे @६०% .

३. निश्चित किमान पेन्शन: किमान १० वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्तीवर @१०००० प्रति महिना

४. महागाई निर्देशांक:खात्रीशीर पेन्शनवर, खात्रीशीर कुटुंब निवृत्तीवेतन आणि खात्रीशीर किमान निवृत्तीवेतन मिळणार आहे. सेवारत कर्मचाऱ्यांसारखे औद्योगिक कामगारांसाठी असलेल्या अखिल भारतीय ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई भत्ता असेल ,ग्रॅच्युइटी व्यतिरिक्त सेवानिवृत्तीवर एकरकमी पेमेंट, प्रत्येक पूर्ण केलेल्या सहा महिन्यांच्या सेवेसाठी सेवानिवृत्तीच्या तारखेनुसार मासिक वेतन (पे+DA) चा 1/10 वा हिस्सा, या पेमेंटमुळे खात्रीशीर पेन्शनचे प्रमाण कमी होणार नाही.

यूपीएसची अंमलबजावणी यूपीएस दि. १.४.२०२५ पासून लागू होईल. समर्थन यंत्रणा आणि आवश्यक कायदेशीर, नियामक आणि लेखा बदल तयार केले जातील., केंद्र सरकारकडून यूपीएस लागू करण्यात येत आहे. २३ लाख केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना फायदा होईल. राज्य सरकारांनी हेच आर्किटेक्चर डिझाइन केले आहे आणि त्याचा अवलंब केला आहे, ज्याचा फायदा सध्या NPS वर असलेल्या ९० लाख राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना होणार आहे.



*मुंबई : दादर, गोखले रोड ची सर्वोदय बिल्डींग रहिवाश्यांतर्फे संविधान दहीहंडी उभारण्यात आली होती. यातून भारतीय नागरिकांनो संविधानाचा अभ्यास करा. आपले नागरी कायदे समजले तरच आजच्या युगात आपण यशस्वी होवू असा संदेश देण्यात आला होता. सर्वोदय बिल्डिंग चे खजिनदार कामगार नेते दिवाकर दळवी हे या उत्सवाचे संयोजक होते.*

## कंत्राटी कामगारांच्या न्याय मागण्यांसाठी सरकारला आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

गेल्या १० वर्षात ४९ हजार कंपन्या बंद पडल्या असून ३ लाख कामगार बेरोजगार झाले आहेत. हेच कामगार अखेर नाइलाजाने कंत्राटात काम करतात.परंतु दुसऱ्या बाजूने त्यांना कायद्याप्रमाणे किमान वेतनही मिळत नाही, सरकारच्या दुर्लक्षीत धोरणातून कंत्राटी कामगारांच्या वाट्याला हलाखीचे जीवन आले आहे.तेव्हा या प्रश्नावर सरकारला जाग आणण्यासाठी आता रस्त्यावर उतरावे लागेल,असा स्पष्ट इशारा भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस, ठाकरे शिवसेनेचे उपनेते, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष आमदार सचिन अहिर यांनी कामगारांच्या आक्रोश मोर्चात बोलताना दिला.

महाराष्ट्र इंटक,एचएमएस, सिटु, भारतीय कामगार सेना, आयटक, एनटियू आय,एआयसीसीटीयू आदि कामगार संघटनांनी,कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समिती,महाराष्ट्राच्या विद्यमाने मंगळवारी आझाद मैदानावर आक्रोश मोर्चा नेण्यात आला होता.

यावेळी कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे समन्वयक डॉ.डी.एल. कराड म्हणाले,कंत्राटी कामगारांचा प्रश्न असेल,अथवा केंद्र सरकारने संमत केलेल्या चार श्रम संहिता असतील, यातून सरकारचे कामगार विरोधी धोरण स्पष्ट झाले आहे. तेव्हा एक कोटींची वोट बँक असलेला कामगारवर्ग विधानसभेत राज्य सरकारला चांगलाच धडा शिकविल्या शिवाय गप्प बसणार नाही!

सर्वश्री गोविंदराव मोहिते, कॉ.उदय भट, निवृत्ती धुमाळ, कॉ.मिलींद रानडे कॉ. सुकुमार दामले, विवेक मोंन्टेरो, कॉ.ताप्ती मुखोपाध्याय,सुधा सुमंत आदींनी सरकारच्या चुकीच्या धोरणाचा खरपूस समाचार घेतला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेतील तरतुदीनुसार कष्टकरी कामगारांना समान कामाला समान वेतन मिळालेच पाहिजे,अशीही मागणी केली.

कामगारांच्या प्रश्नावर सरकारला शिष्टमंडळाद्वारे निवेदन देण्यात आले. निवेदनात कंत्राटी कामगार प्रथा बंद करा.त्यासाठी कंत्राटी कायदा रद्द करा, कंत्राटी कामगारांना सेवेत कायम करा. कामगार संघटनांशी कोणतीही चर्चा न करता संमत केलेल्या चार श्रम सहिता रद्द करा, सर्वच उद्योगातील कामगारांना किमान वेतन दरमहा २६००० रुपये मिळालेच पाहिजे,आदी दहा मागण्या करण्यात आल्या.पुढील आंदोलन बीकेसी येथेच करण्याचा निर्णय आक्रोश मोर्चात घेण्यात आला

याप्रसंगी व्यासपीठावर हिंद मजदूर सभेचे कार्याध्यक्ष व म्युनिसिपल मजदूर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव, हिंद मजदूर सभेचे उपाध्यक्ष विद्याधर राणे, मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे पदाधिकारी दत्ता खेसे, मारुती विश्वासराव, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे निवृत्ती देसाई, प्रसिद्धी प्रमुख काशिनाथ माटल, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे माजी विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील इत्यादी विविध कामगार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते मेळाव्याला कंत्राटी कामगार व महिला प्रचंड संख्येने उपस्थित होत्या.

## मराठी वृत्तपत्र लेखक संघ अमृत महोत्सव सांगता समारंभ 31 ऑगस्टला

### पत्रलेखकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मराठी वृत्तपत्रांमध्ये सातत्याने वाचकांची पत्रे, जनमनाचा कानोसा, पत्रमानस, लोकमानस, बहुतांची अंतरे अशा विविध वृत्तपत्रातील या सदरात विविध विषयांवर पत्रलेखन करून जागल्याची भूमिका साकारणाऱ्या पत्रलेखकाचा प्रातिनिधिक स्वरूपाचा "मराठी वृत्तपत्र लेखक संघ" दादर, मुंबई हा आपला अमृत महोत्सव साजरा करीत आहे. या वर्षात विविध उपक्रम राबवून संघ आता सांगता समारंभाकडे कूच करीत आहे.

दैनिक नवशक्तीच्या वतीने वृत्तपत्र लेखक चळवळीच्या या अमृत महोत्सव वर्षांच्या सांगता निमित्त वृत्तपत्र लेखकांचे संमेलन शनिवार, ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ३.३० वाजता फ्री प्रेस हाऊस, नरिमन पॉइंट, मुंबई येथे मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आले आहे. विशेषतः या संमेलनाला विशेष पाहुणे म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त व प्रशासक भूषण गगराणी तसेच जेष्ठ लेखक व समीक्षक विनय हर्डीकर हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या संमेलनास मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई या संस्थेच्या सर्व सभासदांसह वर्तमानपत्रातून पत्रलेखन करणाऱ्या इतरांनीही उपस्थित राहावे असे आवाहन संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे आणि प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगांवकर यांनी केले आहे. यावेळी दैनिक नवशक्तिच्या वतीने फक्त उपस्थित असलेल्या सर्वांना मानपत्र देण्यात येणार आहे तेव्हा आज बुधवार, २८ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत ९३२३११७७०४ या मोबाईलवर उपस्थित राहणार असल्याबद्दल नाव व मोबाईल क्रमांकासह कळवावे असेही आवाहन करण्यात आहे.



*मुंबई : मुंबई सायन कोळीवाडा, आंबेडकर नगर येथील लायन बॉईज गोविंदा पथक यांना म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना संघटक दत्ताराम सुद यांच्या वतीने टी शर्ट देण्यात आले.सदर टी शर्ट व सराव हंडी उद्घाटन म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना चिटणीस रामचद्र लिंबारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मडळाचे अध्यक्ष कृष्णा संजय गवारे, प्रशिक्षक वैभव शिरोडकर ,मयुर ओगले व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.*



*मुंबई : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार आशिष शेलार यांनी आमदार कालिदास कोळंबकर यांच्या भोईवाडा येथील मानाच्या दहीहंडीला उपस्थिती लावली. यावेळी माजी नगरसेवक नाना अंबोले, राजेश शिरवाडकर,गजेंद्र धुमाळे आणि इतर सर्व भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.*




*मुंबई : गोकुळाष्टमीच्या पूर्व संध्येला गोरेगांव पश्चिम प्रभाग क्रमांक ५८ मधील मोतीलाल नगर क्रमांक १ येथील"आविष्कार प्रतिष्ठान" महिला व बाल गोविंदा पथकाला मुंबई कॉंग्रेस चे सचिव मनोज यादव यांनी टी शॉर्ट चे वाटप केले. व त्यांच्या खेळातला आत्मविश्वास वाढवला.*

## इकबाल सिंग चहल यांच्यावरील आरोपांची पुर्नचौकशी करण्याची मागणी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

पालिकेचे माजी आयुक्त इक्बाल सिंग चहल यांची महाराष्ट्र सरकारने अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) म्हणून नियुक्ती करून त्यांना गृह मंत्रालयात मोठी जबाबदारी दिली आहे, तर याआधी ते मुख्यमंत्री कार्यालयात अतिरिक्त मुख्य सचिव होते. परंतु, कायदा व सुव्यवस्थेची नवी जबाबदारी दिल्यावर त्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली. नवी जबाबदारी दिल्यानंतर विरोधकांनी प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केली आहे.

विरोधकांनी सरकारवर निशाणा साधत ज्या अधिकाऱ्यावर अनेक आरोपांची चौकशी सुरू असताना अशा अधिकाऱ्याला कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी देणे कितपत योग्य आहे, असा सवाल उपस्थित केला आहे. या पोस्टिंगचा खरपूस समाचार घेत शिवसेना उद्धव गटाचे प्रवक्ते आनंद दुबे यांनी 'आरोपांची नव्याने चौकशी करण्याच्या मागणी केली आहे.

आनंद दुबे म्हणाले की, पालिका आयुक्त इक्बाल सिंग चहल यांच्या विरोधात स्ट्रीट फर्निचर घोटाळा, कोविड घोटाळा आहे, ज्याची ईडी आणि आर्थिक गुन्हे शाखा द्वारे चौकशी सुरू आहे.



आमदार यामिनी जाधव यांच्या भायखळा येथील दहीहंडीत गोविंदांनी असे थर रचले...

आमदार मंगेश कुडाळकर यांच्या चेंबूर येथील दहीहंडीत सलामी देताना गोविंदा



प्रभात मित्रमंडळ, सायन, प्रतिक्षानगरच्या गोविंदांनी असे पिरॅमिड रचत सायनची दहीहंडी फोडली.



दादर श्रीसाई मंडळाच्या दहीहंडीत गोविंदांनी छत्रपती शिवरायांचा देखावा सादर करीत उपस्थितांची मने जिंकली




दादर पश्चिम येथील जीवदेवशी मंडळाची दहीहंडी अथक मंडळाने असे मनोरे रचून फोडली

### अवघी तरुणाईच'थरमय' झाली...

मुंबईसह अवघ्या महामुबईतील युवकांसाठी आकर्षण आणि लोकप्रिय ठरणारा 'गोविंदा' म्हणजेच दहीहंडीचा उत्साह मंगळवारी मुंबापुरीत ओसंडून वाहताना दिसला. राजकीय ,सामाजिक संघटनांनी बांधलेल्या हंड्या फोडताना 'ढाक्कुमाक्कुम,ढाक्कुमाक्कुम'च्या तालात मधूनच कोसळणाऱ्या शीतल पर्जन्यधारा अंगावर घेत अवघी तरुणाई 'थरमय' झाली होती. हंड्या फोडण्यासाठी थरांवर थर रचणारे गोविंदा आपले कसरतीचे कसब पणाला लावत थर वाढवताना दिसत होते.थरांच्या या थरारात महाराष्ट्राच्या लाडक्या बहिणी आणि लेकीही मागे नव्हत्या. हायटेक तंत्र आणि उपकरणांमुळे यंदा जखमी होणाऱ्या गोविंदांचे प्रमाण मात्र घटल्याचे दिसले. विविध गोविंदा पथकांनी प्रचलित विषयांवर दृश्ये सादर करुन उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले होते.





सर्व छायाचित्रे
**अनिल पानस्कर, राजेश वराडकर**

# Y गुणसूत्र लुप्त होणार! फक्त मुलींचाच होणार जन्म?

## दर दशलक्ष वर्षांमध्ये पाच जनुकांचे नुकसान

**वृत्तसंस्था**
■ **सिडनी**

आईच्या गर्भात वाढणाऱ्या अर्भकाचे लिंग हे गुणसूत्र ठरवतात. स्त्रीच्या शरीरात दोन X गुणसूत्र असतात आणि पुरुषाच्या शरीरात एक X आणि एक Y गुणसूत्र असतात. नुकत्याच झालेल्या एका अभ्यासात Y गुणसूत्राचे हळूहळू आकुंचन होत असल्याचे समोर आले आहे. Y गुणसूत्र लुप्त होण्याचा धोका असून, ही घट मानवी पुनरुत्पादनाच्या भविष्याविषयी प्रश्न निर्माण करते, अशी चिंता नवीन संशोधनात व्यक्त करण्यात आली आहे.

'सायन्स अलर्ट'च्या रिपोर्टनुसार, नवीन संशोधनात म्हटलं आहे की, मानवी Y गुणसूत्र कमी होत आहेत. भविष्यात पूर्णपणे नाहीसे होऊ शकतात. मात्र, ते संपायला लाखो वर्षे लागतील. मनुष्य Y ला पर्याय म्हणून नवीन जनुक विकसित करू शकला नाही आणि Y गुणसूत्राची घसरण चालू राहिली तर पृथ्वीवरील जीवन नाहीसे होऊ शकते, अशी भीतीही या संशोधनात व्यक्त करण्यात आली आहे.



महिला आणि पुरुषांमध्ये एक X आणि एक Y गुणसूत्र असते. X मध्ये सुमारे 900 जीन्स आहेत. तर Y मध्ये सुमारे 55 जीन्स आणि भरपूर नॉन-कोडिंग DNA आहेत. Y गुणसूत्र हा एक महत्त्वपूर्ण जनुक असतो जो गर्भामध्ये पुरुषांच्या विकासास सुरुवात करतो. गर्भधारणेच्या 12 आठवड्यांनंतर हे मास्टर जनुक इतर जनुकांमध्ये बदलते. हे गर्भामध्ये पुरुष संप्रेरक तयार करते ज्यामुळे बाळाचा मुलगा म्हणून विकास होतो. दोन गुणसूत्रांमधील विषमता वाढत असल्याचे नवीन संशोधन सांगते. गेल्या १६६ दशलक्ष वर्षांमध्ये Y गुणसूत्राने 900-55 सक्रिय जीन्स गमावले आहेत. हे दर दशलक्ष वर्षांमध्ये पाच जनुकांचे नुकसान आहे. या दराने शेवटची ५५ जीन्स ११ दशलक्ष वर्षांत नष्ट होतील. Y क्रोमोसोम कमी झाल्याने शास्त्रज्ञ चिंतेत आहेत.

**Y गुणसूत्र संपल्यानंतर नवीन जनुक विकसित होण्याची आशा**

लाखो वर्षांमध्ये Y गुणसूत्राच्या आकारात लक्षणीय घट झाली आहे प्रोसिडिंग्ज ऑफ द नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेसमध्ये प्रकाशित झालेल्या एका शोधनिबंधात असे दिसून आले आहे की काटेरी उंदरांनी आधीच एक नवीन नर-निर्धारित जनुके विकसित केला असून मानवांसाठी संभाव्य उत्क्रांतीचा मार्ग दर्शवणारा ठरला आहे. या शोधनिबंधात काटेरी उंदराने नवीन नर-निर्धारित जनुके कसे विकसित केले याचे वर्णन केले आहे. हे एका पर्यायी शक्यतेकडे निर्देश करते, मानव एक नवीन लिंग-निर्धारित जनुक विकसित करू शकतो. तथापि, हे चर्चा करण्याएवढे सोपे नाही. कारण त्याचा विकासही अनेक धोकेही आहेत. म्हणजे आता त्याचा पर्याय म्हणून विचार करणे फार घाईचे ठरले, असे मानले जात आहे.

जेनेटिक्स (जनुकीय) अभ्यास तज्ञ प्रोफेसर जेनी ग्रेव्हज स्पष्ट करतात की Y क्रोमोसोमचा आकार कमी होणे ही नवीन घटना नाही. प्लॅटिपसमध्ये, XY गुणसूत्राची जोडी समान सदस्यांसह सामान्य गुणसूत्रांसारखी दिसते. यावरून असे सूचित होते की सस्तन प्राणी X आणि ही गुणसूत्रांची एक सामान्य जोडी फार पूर्वी नव्हती. 166 दशलक्ष वर्षांच्या कालावधीत, Y गुणसूत्राने 900 ते 55 सक्रिय जीन्स गमावले आहेत, हा दर अंदाजे 11 दशलक्ष वर्षांमध्ये Y गुणसूत्र पूर्णपणे गायब होऊ शकतो.

Y क्रोमोसोमच्या घसरणीच्या चिंतेमध्ये, वैज्ञानिकांना अशा दोन उंदरांच्या वंशांनी दिलासा दिला आहे Y गुणसूत्र गमावल्यानंतरही जिवंत आहेत. पूर्व युरोप आणि जपानच्या काटेरी उंदरांमध्ये, अशा प्रजाती आहेत ज्यांचे गुणसूत्र आणि एसआरवाय पूर्णपणे नाहीसे झाले आहेत. अशा जातींमध्ये एक्स गुणसूत्र दोन्ही लिंगांसाठी कार्यक्षम असते. तथापि, हे जीन्सशिवाय लिंग कसे ठरवतात हे स्पष्ट नाही. अशी विचित्र प्रणाली कशी विकसित झाली? आश्चर्यकारक निष्कर्ष असा आहे की ऑस्ट्रेलियाच्या प्लॅटिपसमध्ये पूर्णपणे भिन्न लैंगिक गुणसूत्र आहेत, अधिक पक्ष्यांप्रमाणेच. प्लॅटिपसमध्ये, XY जोडी दोन समान सदस्यांसह एक सामान्य गुणसूत्र आहे. हे सूचित करते की सस्तन प्राणी X आणि Y ही गुणसूत्रांची एक सामान्य जोडी फार पूर्वी नव्हती.

# ममता बॅनर्जींची पॉलीग्राफ टेस्ट करा

## कोलकाता प्रकरणावरून भाजपाचा जोरदार हल्ला

**वृत्तसंस्था**
■ **कोलकाता**

कोलकाता येथील आरजी कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये महिला डॉक्टरवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेवर देशभरात संताप व्यक्त होत आहे. या मुद्द्यावरून राजकारण सुरू आहे. कोलकाता बलात्कार-हत्या प्रकरणी भाजपानेपश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना घेरलं आहे.

भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते गौरव भाटिया यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर जोरदार निशाणा साधला. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांवर कोलकाता पोलीस आयुक्त आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी गौरव भाटिया यांनी केली आहे.

गौरव भाटिया म्हणाले की, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि पोलीस आयुक्तांची पॉलीग्राफ टेस्ट व्हायला हवी. गौरव भाटिया यांनी नबन्ना येथील विद्यार्थ्यांची रॅली रोखल्याबद्दल ममता सरकारवरही हल्लाबोल केला आणि जे सत्याच्या पाठीशी उभे आहेत त्यांच्यावर पोलीस कारवाई करत आहेत असं म्हटलं. "मुख्यमंत्री ममता बॅनर्जींची पश्चिम बंगालमध्ये हुकूमशाही पाहायला मिळत आहे. आंदोलन शांततेत होत आहे पण ममता हुकूमशाह असून त्यांची भूमिका आरोपींच्या पाठीशी उभी राहण्याची आहे. बंगालमध्ये माता-भगिनी सुरक्षित नाहीत."

"सत्य बाहेर आले पाहिजे. सत्य दाबलं जाऊ शकत नाही आणि सर्वात मोठी गोष्ट म्हणजे हे लोक आपल्या पदावर बसून विद्यार्थ्यांना चिरडत आहेत, संविधानाचा अपमान करत आहेत, हे खपवून घेतलं जाणार नाही, हा मुद्दा आज जसा उचलला गेला आहे तसाच तो पुढेही उचलला जाईल" असं गौरव भाटिया यांनी सांगितलं.

# केजरीवालांची न्यायालयीन कोठडी 3 सप्टेंबरपर्यंत वाढली

■ **नवी दिल्ली**

दिल्ली मद्य धोरणाशी संबंधित सीबीआय प्रकरणात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत मंगळवारी 3 सप्टेंबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. केजरीवाल तिहार तुरुंगातून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे राऊस अव्हेन्यू कोर्टात हजर झाले. आपली शुगर लेव्हल खाली जात असल्याचे त्याने कोर्टात सांगितले. यासाठी दुपारचे जेवण घेण्याची परवानगी मागितली. सीबीआयने 14 दिवसांच्या न्यायालयीन कोठडीची मागणी केली होती, मात्र न्यायालयाने केवळ एक आठवड्यांची कोठडी वाढवली.

# जाहिरातींशी संबंधित केंद्राच्या आदेशावर सुप्रीम कोर्टाची बंदी

**वृत्तसंस्था**
■ **नवी दिल्ली**

सुप्रीम कोर्टाने मंगळवारी औषधे आणि सौंदर्य प्रसाधने नियम 1945 मधील नियम 170 काढून टाकण्याच्या केंद्राच्या निर्णयाला स्थगिती दिली. न्यायालयाने यासंबंधीची आयुष मंत्रालयाची अधिसूचनाही रद्द केली आहे. नियम 170 आयुर्वेदिक, सिद्ध किंवा युनानी औषधांच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना प्रतिबंधित करते.

न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने केंद्राला फटकारले. त्यांनी सांगितले की मंत्रालयाची अधिसूचना 7 मे 2024 च्या आदेशाच्या विरोधात आहे. न्यायालयाच्या आदेशानंतरही सरकार नियम 170 काढण्याचा निर्णय कसा घेऊ शकते?

वास्तविक, केंद्राने 29 ऑगस्ट 2023 रोजी एक पत्र जारी केले होते. यामध्ये राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना नियम 170 अंतर्गत कंपन्यांवर कारवाई करू नये किंवा कारवाई करू नये असे सांगण्यात आले आहे.

2018 मध्ये ड्रग्ज आणि कॉस्मेटिक्स नियम, 1945 मध्ये नियम 170 जोडण्यात आला. त्यात म्हटले आहे की आयुर्वेदिक, सिद्ध आणि युनानी औषधे ज्या राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशात उत्पादित केली जातात त्या राज्याच्या परवाना प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय त्यांची जाहिरात केली जाऊ शकत नाही.



न्यायमूर्ती कोहली म्हणाले की, नियम 170 हटवण्याचा काय अर्थ आहे. नियम 170 जाहिरातींवर बंदी घालण्यासाठी किंवा प्रकाशन करण्यापूर्वी तपासण्यासाठी लागू करण्यात आला होता. ती मागे घेण्याचा अर्थ असा आहे की जाहिराती छापल्यानंतर किंवा प्रसारित झाल्यानंतरच त्यांची छाननी केली जाऊ शकते.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी केंद्राकडूनही उत्तर मागितले आहे. न्यायालयाने सांगितले की, 1 जुलै 2024 ची नियम 170 काढून टाकणारी अधिसूचना सरकारकडून स्पष्टीकरण प्राप्त होईपर्यंत स्थगित राहील. म्हणजेच हा कायदा कंपन्यांसाठी लागू राहील.

23 एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान बाबा रामदेव सर्वोच्च न्यायालयात हजर झाले. इंडियन मेडिकल असोसिएशनने (IMA) पतंजलीवर एका जाहिरातीत ॲलोपॅथीबद्दल गैरसमज पसरवल्याचा आरोप केला होता. 23 एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान बाबा रामदेव सर्वोच्च न्यायालयात हजर झाले. इंडियन मेडिकल असोसिएशनने (IMA) पतंजलीवर एका जाहिरातीत ॲलोपॅथीबद्दल गैरसमज पसरवल्याचा आरोप केला होता. पतंजलीच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान 7 मे रोजी सर्वोच्च न्यायालयात नियम 170 चा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

# मायावती पुन्हा बसपच्या अध्यक्षपदी, 21 वर्षांपासून पदावर

## आकाश समन्वयकच राहतील

**वृत्तसंस्था**
■ **लखनौ**

मायावती यांची पुन्हा एकदा बसपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली आहे. लखनौ येथील पक्ष कार्यालयात मंगळवारी झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सतीश मिश्रा यांनी त्यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला.

यानंतर मायावती यांची एकमताने बसपा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. मायावती 21 वर्षे (18 सप्टेंबर 2003) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. राष्ट्रीय अध्यक्षांची निवड दर 5 वर्षांनी होते.



मायावती यांचे पुतणे आकाश आनंद राष्ट्रीय समन्वयक म्हणून कायम राहणार आहेत. मात्र, त्यांचा दर्जा आणखी वाढला आहे. राष्ट्रीय समन्वयकासोबतच त्यांना 4 निवडणूक राज्यांचे (हरियाणा, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, महाराष्ट्र) प्रभारीही बनवण्यात आले आहे.सक्रिय राजकारणातून निवृत्तीचा प्रश्नच उद्भवत नाही, असे मायावती सोमवारी म्हणाल्या होत्या. शेवटच्या श्वासापर्यंत बहुजन मिशनसाठी काम करत राहीन. माझ्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे आकाश आनंदला बसपाचा उत्तराधिकारी म्हणून पुढे करण्यात आल्यापासून जातीयवादी मीडिया अशा खोट्या बातम्या पसरवत आहे. लोकांनी सावध राहावे.

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



28 ऑगस्ट

भुमी हरीश पाताडे

- शुभेच्छुक -
मम्मी-पप्पा, काका-काकी, आजी, मावशी-काका,मामा -मामी, आत्या, दुर्वा आणि पाताडे परिवार.